सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १४९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# रशियाकडून तेल खरेदी करत भारताने रोखले जागतिक संकट, अहवालात मोठा खुलासा

नवी दिल्ली: रशियाकडून भारत तेल खरेदी करत असल्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्या विरोधात भारतावर तब्बल ५० टक्के टॅरिफ लावला असल्याचे स्वतः कबूल केले आहे. असे असले तरी भारताने काही रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवले नाही. उलट अमेरिकेने लादलेल्या अवाजावी टॅरिफवर कडक प्रतिक्रिया देताना, पर्याय म्हणून इतर देशांशी व्यवहार करण्याची योजना भारत आखत आहे. अनेकदा ताकीद देऊनही रशियाकडून तेल विकत घेण्यासंबंधी भारताच्या धोरणामुळे, देशाला टॅरिफचा सामना जरी करावा लागत असला तरी, यामुळे भारताने जागतिक संकट रोखल्याचा दावा एका अहवालाद्वारे सिद्ध करण्यात आला आहे. ते कसे काय? याबद्दल सविस्तर माहिती घेऊया.

ट्रम्प यांचे सहाय्यक पीटर नवारो यांनी युक्रेन संघर्ष प्रत्यक्षात 'मोदींचे युद्ध' असल्याचा दावा केला आहे आणि भारत अनुदानित तेल खरेदी करून रशियाला पाठिंबा देत असल्याचा आरोप केला आहे. पण या उलट उद्योग सूत्रांनी अनेक अद्भुत तथ्ये उघडकीस आणत अमेरिकेचा हा खोटेपणा फेटाळून लावला आहे. भारताने रशियन तेल खरेदी केले नसते तर जागतिक स्तरावर त्याचे परिणाम किती भयानक असू शकतात यांचे स्पष्टीकरण त्यांनी डिळे.

**भारताने जागतिक संकट कसे रोखले?**

सूत्रांचे म्हणणे आहे की भारताने रशियन तेल खरेदी करून जागतिक संकट रोखले. जर भारताने खरेदी करणे थांबवले असते तर आज कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल २०० डॉलर्सपर्यंत पोहोचली असती. या अहवालात असे म्हंटले आहे की, भारताने रशियन तेल खरेदी करून जागतिक संकट रोखले आहे. एक काळ असा होता जेव्हा रशियन तेल जागतिक साखळीतून बाहेर पडण्याच्या भीतीमुळे ब्रेंट क्रूडची किंमत प्रति बॅरल १३७ डॉलर्सपर्यंत पोहोचली होती.

बिझनेस टुडेच्या वृत्तानुसार, भारताच्या आयातीमुळे जागतिक बाजारपेठ स्थिर झाली आहे आणि रशियाला आर्थिक मदत करण्याऐवजी जगभरातील ग्राहकांसाठी इंधनाच्या किमती स्थिर राहण्यास मदत झाली आहे. अमेरिकेच्या अर्थमंत्री जेनेट येलेन यांच्यासह अनेक आंतरराष्ट्रीय व्यक्तींनीही या निर्णयाचे कौतुक केले आहे.




जागतिक बाजारपेठेतून रशियन तेल बाहेर पडण्याची भीती पूर्वी ब्रेंट क्रूड तेलाच्या किमती वाढल्या होत्या. मार्च २०२२ मध्ये, त्याची किंमत प्रति बॅरल १३७ च्या उच्चांकावर पोहोचली होती. त्यानंतर भारताने रशियन तेल खरेदी करून जागतिक परिस्थिती हाताळली आहे. एएनआय सूत्रांनुसार, भारताने नियमांनुसार रशियन तेल खरेदी केले आहे आणि कोणत्याही नियमांचे उल्लंघन केलेले नाही.

ट्रम्पचे सहाय्यक पीटर नवारो यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला ब्लूमबर्गला मुलाखत दिली होती, ज्यामध्ये त्यांनी दावा केला होता की भारत सवलतीच्या दराने तेल खरेदी करून रशियाला मदत करत आहे. जर भारताने आता रशियन तेल खरेदी करणे थांबवले तर त्याला अमेरिकेच्या टॅरिफमध्ये तात्काळ २५ टक्के सूट मिळू शकते. नवारो म्हणाले की युक्रेनमध्ये शांततेचा मार्ग भारतातून जातो.

उद्योग सूत्रांनी सांगितले की लोकप्रिय दाव्यांच्या विपरीत, भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्या रशियन तेलासाठी अमेरिकन डॉलर वापरत नाहीत. सूत्रांनी सांगितले की खरेदी तिसऱ्या देशांतील व्यापाऱ्यांद्वारे केली जाते आणि -एऊ सारख्या चलनांमध्ये सेटलमेंट केली जाते. अमेरिकन सरकारने भारताला कधीही खरेदी थांबवण्यास सांगितले नाही. भारताचा व्यापार पूर्णपणे कायदेशीर आहे आणि तो ऋ७ आणि युरोपियन युनियनच्या निश्चित किंमत नियमांनुसार आहे.

**तेलाच्या काळ्या बाजाराबद्दल त्यांनी काय म्हटले?**

भारताने तेलाच्या काळ्या बाजाराच्या अटकळांनाही नकार दिला. सूत्रांनी पुढे सांगितले की, 'रशियन तेलावर इराणी किंवा व्हेनेझुएलाच्या तेलाप्रमाणे बंदी नाही. ते नफाखोरी रोखण्यासाठी पाश्चात्य देशांनी तयार केलेल्या निश्चित मर्यादा प्रणाली अंतर्गत विकले जाते. जर अमेरिकेला रशियन तेलावर बंदी घालायची असती तर त्याने तसे केले असते, परंतु त्याने तसे केले नाही कारण त्याला बाजारात रशियन तेलाची आवश्यकता आहे.'

**भारत विरुद्ध अमेरिका**

भारत रशियन तेल शुद्धीकरणाचे केंद्र बनल्याचे आरोप देखील फेटाळण्यात आले आहेत. उद्योग सूत्रांनी सांगितले की भारत गेल्या अनेक दशकांपासून जगातील चौथ्या क्रमांकाचा रिफायनर आहे. कच्च्या तेलाचे शुद्धीकरण आणि इंधन निर्यात करणे, जागतिक व्यवस्था अशा प्रकारे कार्य करते. रशियन कच्च्या तेलावर बंदी घातल्यानंतर, युरोप स्वतः भारतीय डिझेल आणि जेट इंधनावर अवलंबून झाला आहे.

रिफायनरीज त्यांचे नफा परदेशात पाठवत आहेत का, यावर सूत्रांनी स्पष्ट केले की देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी सुमारे ७०% रिफायन केलेले इंधन भारतातच आहे. रिलायन्सच्या एका रिफायनरीजने या युद्धाच्या खूप आधीपासून २००६ पासून निर्यातीवर लक्ष केंद्रित केले आहे. देशांतर्गत वापर वाढल्याने रिफायन केलेले इंधन निर्यात प्रत्यक्षात घटली आहे.

भारत हा रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल खरेदी करून त्याच्यावर रिफायनरी करून जगभरात विकून नफेखोरी करत असल्याचा आरोप हा अमेरिकेकडून करण्यात आला. मात्र, भारताने जर हे केले नसते तर जगभरात मोठे संकट आले असते. भारतावर अमेरिकेने ५० टक्के टॅरिफ लावल्याने निर्यात मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. मात्र, याचे नुकसान कसे भरून काढायचे यासाठी सरकार प्रयत्न करत आहे.

## मराठा आरक्षणासंदर्भात सर्व प्रश्नांची उत्तर एकनाथ शिंदेंच देऊ शकतील : राज ठाकरे



ठाणे: मराठा आरक्षणाच्या विषयावरुन मुंबईत मनोज जरांगे पाटील यांचं आझाद मैदानावर आंदोलन सुरु आहे. आज त्यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आज ठाण्यात पक्षाच्या एका कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना मराठा आंदोलनाविषयी त्यांनी सूचक वक्तव्य केलं आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे मुंबईत आज वाहतूक कोंडीची स्थिती निर्माण झाली होती. काही मराठा आंदोलक हे आझाद मैदानानजीक मुंबई महापालिकेच्या समोर येऊन ठिय्या आंदोलनाला बसले होते. यामुळे मोठी वाहतूककोडीं झाली. सलग दुसऱ्या दिवशी ईस्टर्न फ्री वेवर वाहनांच्या लांबच लांब रांगा बघायला मिळत आहेत. ज्याबद्दल राज ठाकरे यांना काही पत्रकारांनी प्रश्न केले. यावर राज ठाकरे यांनी, याबद्दल एकनाथ शिंदे बोलू शकतील असे सांगितले.

**काय म्हणाले राज ठाकरे?**

मराठा आरक्षण आंदोलन आणि मनोज जरांगे पाटील या विषयावर राज ठाकरे यांनी खूप सूचक प्रतिक्रिया दिली. मराठा आरक्षणासंदर्भात सर्व प्रश्नांची उत्तर एकनाथ शिंदेंच देऊ शकतील. जरांगे परत का आले याचं उत्तर तेच देऊ शकतील असं राज ठाकरे म्हणाले. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे मुंबईकरांना त्रास होतोय. त्यावर राज ठाकरे म्हणाले की, मागच्यावेळी मनोज जरांगे पाटील मुंबईकडे येत असताना एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईत जाऊन प्रश्न सोडवलेला ना, मग हे परत का आले? असं राज ठाकरे म्हणाले.

## पंतप्रधान मोदी सात वर्षांनंतर चीन दौऱ्यावर, जिनपिंग आणि पुतिनना भेटणार

तियानजिन : जपानच्या दौऱ्यानंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनच्या दौऱ्यावर आहेत. ते विशेष विमानाने चीनमधील तियानजिन शहरात पोहोचले. तियानजिन शहरात शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशनची शिखर परिषद होणार आहे. या परिषदेत पंतप्रधान मोदी, चीनचे अध्यक्ष जिनपिंग, रशियाचे अध्यक्ष पुतिन आणि एससीओचे अर्थात शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशनचे सदस्य असलेल्या इतर देशांचे नेते अनेक मुद्यांवर सविस्तर चर्चा करतील.

शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या शिखर परिषदेच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी सात वर्षांनंतर चीनचा दौरा करत आहेत. ते एसीओच्या बैठकीत सहभागी होतील तसेच एससीओच्या सदस्य देशांच्या नेत्यांशी स्वतंत्र द्वीपक्षीय चर्चा करण्याचीही शक्यता आहे. पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष जिनपिंग तसेच मोदी आणि रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्यात द्वीपक्षीय चर्चा होण्याची दाट शक्यता आहे.



मोदींचे चीनमध्ये तियानजिन शहरात चीनकडून जोरदार स्वागत झाले. मोदींच्या स्वागतासाठी लाल गालिचा अंथरण्यात आला होता. पंतप्रधान मोदींचे आगमन होताच चिनी महिला कलाकारांनी नृत्य करुन त्यांचे स्वागत केले. याआधी २०२४ मध्ये रशियातील काझान येथे आणि २०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत मोदी आणि जिनपिंग यांची भेट झाली होती. आता एससीओच्या निमित्ताने मोदी आणि जिनपिंग पुन्हा एकदा भेटणार आहेत. ही भेट तियानजिन शहरात होणार आहे.

काही दिवसांपूर्वीच चीनचे परराष्ट्रमंत्री भारत - चीन सीमाप्रश्नावरील चर्चेसाठी दिल्लीत येऊन गेले होते. तर अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आणि चीनवर ३० टक्के टॅरिफ लादला आहे. या पार्श्वभूमीवर शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या शिखर परिषदेच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष जिनपिंग तसेच रशियाचे अध्यक्ष पुतिन हे चीनमधील तियानजिन शहरात भेटणार आहेत. यामुळे या भेटीत काय घडते याकडे अनेकांचे लक्ष आहे.

## शिंदे समिती आणि जरांगेंच्या बैठकीत तोडगा नाहीच

मुंबई : मनोज जरांगे आणि त्यांचे समर्थक मुंबईत आझाद मैदान येथे आंदोलन करण्यासाठी जमले आहेत. जरांगेंनी आरक्षण मिळावे म्हणून बेमुदत उपोषण सुरू करत असल्याचे जाहीर केले आहे. राज्य शासनाच्या शिष्टमंडळाने जरांगेंशी चर्चा केली. याप्रसंगी बोलताना शिष्टमंडळाने दोन लाख ३९ हजार प्रमाणपत्र मान्य केल्याचे सांगितले. पण जरांगे त्यांच्याच मागणीवर अडून बसले आहेत. बराच वेळय चर्चा झाली पण शिंदे समिती आणि जरांगेंच्या बैठकीत तोडगा निघाला नाही.



मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या आणि तातडीने तशी प्रमाणपत्र द्या; अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. 'मराठा समाजाला कुणबी घोषित केल्याशिवाय मी हटणार नाही. आदेशाची अंमलबजावणी झाल्याशिवाय मी माघारी परतणार नाही. मराठवाड्यातील एक लाख २३ हजार कुणबी गेले कुठे ?' असं जरांगे म्हणाले. 'शिंदे समितीने तेरा महिने अभ्यास केला. आता अहवाल द्यावा, आता एक मिनिटही देणार नाही, उद्या सकाळपर्यंत प्रमाणपत्र हातात द्या', असंही जरांगे म्हणाले.

जरांगेंनी ही मागणी केल्यानंतर शिंदे समितीने तातडीने एक बैठक घेण्याचा निर्णय घेतला. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शिंदे समितीची बैठक झाली. ही बैठक थोड्या वेळापूर्वीच संपली पण जरांगेंना अपेक्षित निर्णय झालाच नाही.

## ५०० हून अधिक ड्रोन आणि ४५ क्षेपणास्त्रांचा मारा... रशियाचा युक्रेनवर मोठा हल्ला

कीव: रशियाने युक्रेनचा सर्वात मोठा ड्रोन हल्ला उधळून लावत त्याच्या प्रत्युत्तरादाखल युक्रेनवर ड्रोन हल्ले चढविले आहेत. रशियाच्या हवाई संरक्षण यंत्रणेने शनिवारी क्रिमिया आणि इतर भागात २० युक्रेनियन ड्रोन पाडल्याचे सांगितले तर. दुसरीकडे रशियाने युक्रेनच्या १४ प्रदेशांमध्ये ५०० हून अधिक ड्रोन आणि ४५ क्षेपणास्त्रे डागली आहेत. या हल्ल्यामुळे अनेक भागात वीजपुरवठा खंडित झाला, तीन जणांचा मृत्यू झाला आणि ४० हून अधिक जखमी झाले. अलिकडच्या काळात, रशिया-युक्रेनने पुन्हा एकदा संघर्ष तीव्र केला आहे आणि एकमेकांवर हवाई हल्ले वाढवले आहेत. रशियाने युक्रेनच्या १४ प्रदेशांमध्ये ५०० हून अधिक ड्रोन आणि ४५ क्षेपणास्त्रे डागली. युक्रेनच्या हवाई संरक्षण यंत्रणेने अनेक हल्ले रोखण्यात यश मिळवले. परंतु अनेक क्षेपणास्त्रे संरक्षण यंत्रणेत घुसण्यात यशस्वी झाली. युक्रेनच्या स्थानिक अधिकाऱ्यांच्या मते, या हल्ल्यामुळे अनेक भागात वीज खंडित झाली



आणि अनेक लोक जखमी झाले. अनेक घरे आणि वीज प्रकल्पांचेही नुकसान झाले आहे. झापोरिझिया, लुत्स्क आणि डनिप्रो सारख्या शहरांमध्ये सर्वाधिक नुकसान झाले आहे. झापोरिझियामध्ये २५०० घरांची वीज खंडित झाली आहे. या हल्ल्यांमध्ये किमान तीन जणांना आपला जीव गमवावा लागला आणि ४० हून अधिक जण जखमी झाले, ज्यात मुलेही होती. युक्रेनियन सैन्याने असाही दावा केला की त्यांनी रशियाच्या ताब्यातील भागात प्रत्युत्तर दिले. युक्रेनच्या लष्करी गुप्तचर यंत्रणेनुसार, युक्रेनने क्रास्नोडार आणि सिझरानमधील रशियाच्या तेल शुद्धीकरण कारखान्याला ड्रोन हल्ल्यांनी आग लावली. युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी दावा केला की युद्धाबाबत नेते बैठक घेणार असताना मॉस्कोने हे हल्ले जाणूनबुजून केले आहेत. त्यांनी मॉस्कोवर ऊर्जा आणि बँकिंग निर्बंधांची मागणी केली आहे.

**युक्रेनियन संसदेचे माजी सभापती आंद्री पारुबी यांची हत्या**

युक्रेनियन संसदेचे माजी सभापती आंद्री पारुबी यांची हत्या झाल्याची पुष्टी झाली आहे. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी शनिवारी याची पुष्टी केली आणि याला 'भयानक हत्या' म्हटले. त्यांनी द वर लिहिले की, 'माझ्या संवेदना त्यांच्या कुटुंबासोबत आणि प्रियजनांसोबत आहेत. खुन्याच्या शोध आणि तपासात सर्व आवश्यक सैन्य आणि साधने तैनात करण्यात आली आहेत.'

## दहशतवाद्यांना मदत करणारा समंदर चाचा चकमकीत ठार

जम्मू आणि काश्मीर: जम्मू आणि काश्मीरच्या गुरेझ सेक्टरमध्ये सुरक्षा दलांना मोठे यश आलं आहे. दहशतवादी संघटनांमध्ये 'ह्यूमन जीपीएस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बागू खान उर्फ 'समंदर चाचा' चकमकीत ठार झाला आहे. १९९५ पासून पीओकेमध्ये सक्रिय असलेल्या समंदर चाचाने आतापर्यंत १०० हून अधिक दहशतवाद्यांना घुसखोरीसाठी मदत केली होती. त्याचा मृत्यू दहशतवादी नेटवर्कला मोठा धक्का मानला जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, समंदर चाचासोबत आणखी एक पाकिस्तानी घुसखोरही मारला गेला आहे. बागू खान उर्फ समंदर चाचा १९९५ पासून पाकव्याप्त काश्मीर मध्ये राहत होता. भारतीय सुरक्षा दलाच्या मते, गेल्या तीन दशकांत तो गुरेझ सेक्टर आणि आसपासच्या भागातून १०० हून अधिक घुसखोरीच्या प्रयत्नांमध्ये सहभागी होता, त्यापैकी बहुतेक यशस्वी झाले.

## बंधन बँकेला आरबीआयने ४४.७९ लाखांचा दंड ठोठावला

मुंबई प्रतिनिधी:काही वैधानिक आणि नियामक अनुपालनातील त्रुटींसाठी रिझर्व्ह बँकेने बंधन बँकेला ४४.७ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.शुक्रवारी एका निवेदनात, आरबीआयने म्हटले आहे की ३१ मार्च २०२४ रोजी बँकेच्या आर्थिक स्थितीच्या सं दर्भात बँकेच्या पर्यवेक्षी मूल्यांकनासाठी एक वैधानिक तपासणी करण्यात आली.आरबीआयच्या निर्देशांचे पालन न केल्याच्या पर्यवेक्षी निष्कर्षांवर आणि त्या संदर्भात संबंधित पत्रव्यवहारांवर आधारे ३१ मार्च २०२४ रोजी बँकेच्या आर्थिक स्थितीसाठी दंड का लावला जाऊ नये याची कारणे दाखवा असा सल्ला देणारी नोटीस बँकेला देण्यात आली.



आरबीआयच्या निर्देशांचे पालन न केल्याच्या पर्यवेक्षी निष्कर्षांवर आणि त्या संदर्भात संबंधित पत्रव्यवहारांवर आधारित बँकेला एक नोटीस बजाव ण्यात आली ज्यामध्ये बँकेने आरबीआयच्या निर्देशांचे पालन न केल्याबद्दल दंड का लावला जाऊ नये याची कारणे दाखवा असा सल्ला देण्यात आला.

आरबीआयने असेही म्हटले आहे की,' बँकेने काही कर्मचाऱ्यांना कमिशनच्या स्वरूपात मोबदला दिला आहे. तसेच, बंधन बँकेने काही खात्यांच्या डेटाच्या बाबतीत बॅक-एंडद्वारे मॅन्युअल हस्तक्षेप केला होता आणि सिस्टममध्ये विशिष्ट वापरकर्त्यांच्या तपशीलांसह ऑडिट ट्रेल्स/लॉग्स ऑफ ॲक्सेस कॅप्चर केले नव्हते.

तथापि आरबीआयने म्हटले आहे की हा दंड वैधानिक आणि नियामक अनुपालनातील त्रुटींवर आधारित आहे आणि बँकेने तिच्या ग्राहकांशी केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर निर्णय घेण्याचा बँकेचा हेतू नाही.

## बीडमध्ये भीषण अपघातात ४ जणांचा जागीच मृत्यू, दोन जण गंभीर जखमी

बीड: बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली आहे. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील बीडजवळील नामलगाव फाटा येथील उड्डाणपुलाजवळ भरधाव कंटेनरने सहा जणांना चिरडले. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी आठच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. अपघातातील सर्व लोक पेंडगाव येथे दर्शनासाठी जात असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे, मात्र त्यांची नावे अद्याप समजू शकलेली नाहीत. भरधाव वेगाने आलेल्या कंटेनरने रस्त्यावरून चालणाऱ्या लोकांना चिरडले. धडक इतकी जोरदार होती की, चार जणांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातानंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. काही दिवसांपूर्वी याच महामार्गावर, गढी उड्डाणपुलाजवळ अशाच प्रकारच्या अपघातात पाच ते सहा लोकांचा मृत्यू झाला होता. वारंवार होणाऱ्या या अपघातांमुळे स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, कंटेनर चालकाला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरू आहे.

## घटनेत दुरूस्ती केल्यास मराठा अरक्षणाचा प्रश्न सुटेल : शरद पवार

अहिल्यानगर: मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलनाला सुरुवात केली आहे. आज आंदोलनाचा दुसरा दिवस असून जो पर्यंत सरकार मागण्या पूर्ण करत नाही तोपर्यंत आंदोलन चालूच राहणार असल्याची घोषणा जरांगेने केली आहे. ऐन गणेशोत्सवात सुरू केलेल्या या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर मराठा समाज मुंबईत दाखल झाल्याने, त्याचा परिणाम प्रशासन आणि वाहतूक व्यवस्थेवर होत आहे. या आंदोलनावरून सत्ताधारी आणि विरोधकांच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत असताना, राष्ट्रवादी कोंग्रेस नेते शरद पवार यांनी मराठा आरक्षणावरून मोठे वक्तव्य केले आहे. शरद पवार यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी घटनेत बदल करता येऊ शकतो असे विधान केले आहे, त्यासाठी त्यांनी तामिळनाडूचा संदर्भ घेत हे शक्य होऊ शकते,



असे म्हंटले आहे. त्यांच्या या विधानामुळे मराठा समाज अरक्षणाबाबत आणखीनच आशावादी होण्याची शक्यता आहे.

नुकताच शरद पवार यांनी मराठा आरक्षणावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या या विधानाने सर्वांचे लक्ष वेधून घेतला आहे. शरद पवार यांनी अहिल्यानगरमधील एका कार्यक्रमात हजेरी लावली, यादरम्यान ते बोलत होते. या कार्यक्रमात मराठा समाजाच्या आरक्षाविषयी बोलताना ते म्हणाले, ७२ टक्के आरक्षण तामिळनाडूमध्ये होऊ शकते. तर घटनेत बदल करता येऊ शकते. घटनेत बदल (दुरुस्ती) करण्याची भूमिका घेतली तरच मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो. यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षांना मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याबाबत आपली भूमिका जाहीर करण्यास सांगितले होते. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी मराठा आरक्षणाच्या बाजूने भूमिका घेतली आहे. यावर आता फडणवीस सरकार काय प्रतिक्रिया देते ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे. तसेच आज आझाद मैदानावर होत असलेल्या मराठा आंदोलनासाठी देण्यात आलेली एक दिवसाची मुदतवाढ देखील संपत आली आहे. इतकेच नव्हे तर, गेले दोन दिवस मराठा आंदोलनात उसळलेली गर्दी आणि त्यामुळे मुंबईची विस्कळीत झालेली वाहतूक व्यवस्थेचा विचार करता सरकार काय निर्णय घेणार आहे, याकडे जनसामान्यांच्या नजरा लागल्या आहेत.

## जम्मू-काश्मीर: रामबनमध्ये ढगफुटीमुळे हाहाकार; तीन ठार, पाच बेपत्ता

जम्मू-काश्मीर: जम्मू आणि काश्मीरमधील रामबन जिल्ह्यात ढगफुटीसदृश पाऊस आणि भूस्खलनामुळे मोठे नुकसान झाले आहे. रामबनच्या राजगढ भागात झालेल्या या नैसर्गिक आपत्तीत तीन लोकांचा मृत्यू झाला असून, पाच जण बेपत्ता असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. घटनास्थळी बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असून, बेपत्ता लोकांचा शोध घेतला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे, ज्यामुळे अनेक ठिकाणी ढगफुटी आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. याचमुळे रामबन जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. या ढगफुटीमुळे अनेक घरांचेही मोठे नुकसान झाले असून, काही घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग (छक-४४) देखील ठप्प झाला आहे, ज्यामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. प्रशासनाने लोकांना सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आणि आवश्यक असल्याशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. या भागातील शाळा आणि महाविद्यालये ३० ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवस मुसळधार पाऊस सुरू राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे, त्यामुळे प्रशासनाने सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### मासोळी धरणात ८९ टक्के जिवंत पाणीसाठा

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** गंगाखेड तालुक्यातील मासोळी धरणात २९ ऑगस्ट रोजी सकाळपर्यंतच्या अहवालानुसार ३१.००१ दलघमी इतका एकूण पाणीसाठा नोंदवला गेला आहे. यामध्ये जिवंत पाणीसाठा २४.०६१ दलघमी असून तो सुमारे ८९ टक्के इतका आहे.

या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ३४.०८१ दलघमी आहे. यामध्ये मृत पाणीसाठा ६.९४० दलघमी आणि जिवंत पाणीसाठा २७.१४१ दलघमी आहे. आज सकाळी धरणाची पाण्याची उंची ४१५.७६ मीटर इतकी नोंदली गेली. गेल्या काही दिवसांपासून संततधार पावसामुळे धरणातील जलसाठा लक्षणीयरीत्या वाढला आहे. त्यामुळे परिसरातील पाण्याची उपलब्धता सुनिश्चित झाली असून सिंचन आणि पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळाला आहे.

### माजलगाव धरणातून पाणी सोडण्याचा इशारा; सिंदफणा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**परभणी,/प्रतिनिधी:** माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या जोरदार पावसामुळे धरणातील पाणीपातळी झपाट्याने वाढत असून धरण सध्या ८५.२६ टक्के भरले आहे. हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिल्याने कोणत्याही क्षणी अतिरिक्त पाणी सिंदफणा नदीपात्रात सोडावे लागेल, असा इशारा जलसंपदा विभागाने दिला आहे.

आज शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजेपर्यंत मिळालेल्या माहितीनुसार धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळे पाणी साठा नियोजित मर्यादेपेक्षा वाढल्यास अधिकचे पाणी नदीपात्रात सोडले जाईल. यामुळे सिंदफणा व गोदावरी नदीकाठच्या गावांनी खबरदारी घ्यावी आणि महसूल यंत्रणेमार्फत सतर्कता बाळगावी, नागरिकांना सुरक्षिततेसाठी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंत्यांनी केले आहे.

### निम्न दुधना धरणाचे गेट उघडले; २०१७.७२ क्युसेकने पाण्याचा विसर्ग : दुधना नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

सेलू,दि.२९(प्रतिनिधी) : निम्न दुधना प्रकल्प क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्याने धरणातील पाणीपातळी झपाट्याने वाढत आहे. यामुळे आज शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता धरणाचे गेट क्र. ०१ आणि २० प्रत्येकी ०.३ मीटर उघडण्यात आले असून दुधना नदीपात्रात २०१७.७२ क्युसेक (५७.१३ क्यूमेक) इतका विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

यापूर्वी ही गेट ०.१० मीटर उघडण्यात आली होती आणि त्याद्वारे ६७२.५८ क्युसेक (१९.०५ क्यूमेक) विसर्ग सुरू होता. सध्या पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात सुरू असून परिस्थितीनुसार विसर्गात वाढ अथवा घट केली जाणार असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली. दरम्यान, प्रशासनाने दुधना नदीकाठच्या सर्व गावांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. कुणीही नदीपात्रात प्रवेश करू नये तसेच जिवीत वा वित्तहानी होऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना यांनी केले आहे.

### मौजे पूयणी गावात पूर; सात गावांचा संपर्क तुटला

**पालम,/प्रतिनिधी :** पालम तालुक्यातील मौजे पूयणी येथे लेंडी नदीवर पूर आल्यामुळे नदीचे पाणी गावात घुसले असून तालुक्यातील सात गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे.

पूयणी गाव पालमपासून केवळ तीन किलोमीटर अंतरावर असून, प्रभावित गावांमध्ये पूयणी, तेलजापूर, गणेश वाडी, नाव्हा, नावलगाव, कांजलगाव आणि वनभुजवाडी यांचा समावेश आहे. दि. १६ ऑगस्टला आलेल्या पहिल्या पूरानंतर या गावांचा संपर्क बंद झाला आणि गावकऱ्यांना तालुक्यातील कामासाठी २० ते २५ किलोमीटर दूर जावे लागत आहे. स्थानिकांच्या मते, कंत्राटदाराच्या चुकीच्या बांधकाम पद्धतीमुळे, पैसे वाचवण्याच्या उद्देशाने तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांच्या दुर्लक्षामुळे या गावांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नवीन पुलाचे बांधकाम सुरू असताना तयार केलेला पुल निकृष्ट दर्जाचा असल्याचे आढळले. थातूरमातूर काळी माती टाकल्यामुळे हा पुल पूर्णपणे वाहून गेला. या कारणास्तव सात गावातील विद्यार्थ्यांची शाळा आठ दिवसांपासून प्रभावित झाली आहे. तसेच रुग्णांनाही गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. आडगाव येथील एका रुग्णाची वैद्यकीय मदत वेळेत न मिळाल्यामुळे प्राणधोक्याची परिस्थिती निर्माण झाली.
गावकरी मंडळी या घटनेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षाबद्दल संताप व्यक्त करत आहेत आणि यावर त्वरित लक्ष देण्याची मागणी करत आहेत. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन केले आहे.

### दारूच्या रागातून पुतण्याचा निर्घृण खून; हिवरा गावात शोककळा

**पूर्णा,/प्रतिनिधी :** पूर्णा तालुक्यातील मौजे हिवरा येथे रागाच्या भारात चुलत्याने स्वतःच्या पुतण्यावर चाकूने सपासप वार करून त्याचा खून केला. ही घटना शुक्रवारी (दि. २९ ऑगस्ट) पहाटे सुमारे सहा वाजता घडली.

स्वप्निल देवीदास निवडंगे (वय ३०, रा. हिवरा, ता. पूर्णा) असे मयत पुतण्याचे नाव आहे. आरोपी चुलता डिगांबर सोपान निवडंगे (वय ५०) याला दारूच्या व्यसनामुळे अनेकदा गावकऱ्यांनी आणि कुटुंबीयांनी समजावले होते. दारू सोड, घर व समाजात बदनामी करु नकोस, असा सल्ला पुतण्या स्वप्निल याने दिला, याच सल्ल्याचा राग धरून डिगांबरने शुक्रवारी पहाटे स्वप्निलवर धारदार चाकूने हल्ला केला. मानेवर, छातीवर आणि पोटावर अनेक वार केले, ज्यामुळे स्वप्निल गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. समाधान पाटील, ठाणेदार सुशांत किनगे, जमादार दत्ता काकडे व चंद्रमुनी हानवते यांनी धाव घेतली आणि मारेकरी डिगांबर निवडंगे यास ताब्यात घेतले.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.
**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**
९४ २३३२४६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# पाण्याच्या टाकीच्या खड्ड्यात पडून १० वर्षीय बालकाचा मृत्यू

## प्रशासनाविरोधात संताप, नगरपरिषदेला कुलूप ठोकून ठिय्या आंदोलन

**मोहन धारासूरकर**

**परभणी/प्रतिनिधी-** पूर्णा शहरातील नालंदा नगरातील १० वर्षीय विश्वदीप संतोष कांबळे या चिमुकल्याचा पाण्याच्या टाकीच्या बांधकामासाठी खोदलेल्या उघड्या खड्ड्यात पडून पाण्यात बुडून मृत्यू झाला. गुरुवारी मध्यरात्री ही घटना उघडकीस आल्यानंतर तब्बल १२ तास उलटूनही कोणताही गुन्हा दाखल न झाल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. या निष्काळजीपणाविरोधात संतप्त नागरिकांनी आणि कार्यकर्त्यांनी नगरपरिषदेला कुलूप ठोकून ठिय्या आंदोलन केले. जबाबदार अधिकारी कुठे आहेत?, मृताच्या कुटुंबाला न्याय द्या, नगरपरिषदेला कुलूप ठोका अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

आंदोलनकर्त्यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी, पाणीपुरवठा अभियंता आणि संबंधित गुत्तेदार यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. बांधकाम सुरू असताना कोणतीही सुरक्षेची खबरदारी न घेता खड्डा उघडाच ठेवण्यात आल्याने निष्पाप बालकाचा बळी गेला, हे प्रशासनाचे थेट निष्काळजीपण असून जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करून गुत्तेदारावर कठोर कारवाई करावी, अशी आक्रमक भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली.

आंदोलनादरम्यान नागरिकांनी शहरातील इतर गंभीर समस्या उचलून धरल्या. बंद पडलेले पददिवे, रस्त्यावरील खड्डे, ढिसाळ पाणीपुरवठा अशा अनेक प्रश्नांवर संताप व्यक्त झाला. नगरपरिषदेच्या बेफिकीर कारभारामुळे नागरिकांचे हाल होत असून आता न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागते, असा आरोप नागरिकांनी केला.
संतप्त कार्यकर्त्यांनी कार्यालयाचे दरवाजे बंद करत कुलूप लावले. घोषणाबाजी सुरू असताना पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षांचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. मृताच्या कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

आंदोलनकर्त्यांमध्ये राजू नारायणकर, राजेश भालेराव, प्रताप कदम, देवराव खंदारे, सुनील मगरे, मुन्ना राठोड, बाबा पठाण, लक्ष्मीकांत शिंदे, मोहन गुंजकर, संजय वाघमारे, महेबूब तांबोळी, राज ठाकर, गोविंद ठाकूर, विश्वनाथ होळकर, किशोर सूर्यवंशी, श्रीनिवास तेजबंद, श्याम महामुने, सुनील डुबेवार, धारबा गायकवाड आदींसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नंतर आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला निवेदन देत शहरातील सर्व प्रश्नांवर तातडीने कारवाई करावी, तसेच या दुर्घटनेप्रकरणी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली.

## खोरस येथील युवक शेतातून परत येत असतांना लेंडी नदीत वाहून गेला



**पालम,/प्रतिनिधी-** तालुक्यातील खोरस येथील परमेश्वर साहेबराव खंडागळे (वय २५) हा युवक दि. २९ रोजी सायंकाळी ७ च्या दरम्यान शेतातून घरी परत येत असताना गावाजवळील लेंडी नदीत पाय घसरून वाहून गेला. घटनेची माहिती मिळताच गावकरी व पोलिसांनी तत्काळ शोधमोहीम सुरू केली.

मात्र अंधार दाटल्याने शोधकार्याला अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे आज दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी सहा वाजल्या पासुन बोटीद्वारे शोधमोहीम चालू केले आहे. आशी माहिती गंगाखेड येथील उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांनी दिली आहे.

या शोध मोहीमेत उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर,मंडळ अधिकारी आलेवार, तलाठी शुभांगी आळे, महसूल सहाय्यक शिवप्रसाद वाव्हळे,माधव कांबळे,लक्ष्मण जाधव, देवानंद शिनगारे,संजय चव्हाण हे कर्मचारी कार्यरत आहेत, या घटनेमुळे खोरस गावात हळहळ व्यक्त केली जात असून परिसरात शोककळा पसरली आहे.

## पालम नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदी अनवरी बेगम हिदायतुल्ला खाँ पठाण यांची बिनविरोध निवड



**पालम,/प्रतिनिधी-** दि २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता पालम नगरपंचायतीच्या नगर अध्यक्ष पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली.

यावेळी नगरपंचायत चे १६ नगरसेवक व एक स्वीकृत नगरसेवक -उपस्थित होते तर १ नगरसेवक व एक स्वीकृत नगरसेवक = अनुपस्थित होते. नगर अध्यक्ष पदासाठी अनवरी बेगम हिदायतुल्ला खॉ पठाण यांचा एकच अर्ज आला होता त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक प्रक्रिया शांततेत पार -पडली. यावेळी नगरपंचायत चे मुख्याधिकारी डॉ उत्कर्ष गुट्टे व नगर पंचायत चे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते नवनिर्वाचित नगराध्यक्ष यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आला.

यावेळी वसंतराव काका सिरस्कर उपनगर आध्यक्ष भास्करराव आप्पा सिरस्कर, आमदार रत्नाकरराव गुट्टे काका मित्रमंडळाचे जिल्हा अध्यक्ष अँड संदिप आळनूरे पालम प्रभारी माधवराव गायकवाड, तुषार गोळेगावकर, इमदात खॉ पठाण, जियाउल्लाखा पठाण, उबेदखा पठाण, संजय थिट्टे, शेफ चाऊस, आजीम खा पठाण, रहिमत्तुला खा पठाण, मोबीन खुरेशी, माऊली घोरपडे, जालिंदर हत्तीअंबीरे, प्रभाकर सिरस्कर, गजानन पवार, गौतम हत्तीअंबीरे, सय्यद विखार, कैलास रूद्रवार हैदरखॉ पठाण, सुगंध हिवरे समिर खॉ पठाण, विजय घोरपडे, शेख गौस, आसदखा पठाण, रशीद खाँ पठाण, बाळासाहेब ढोले, चंद्रशेखर लांडगे, सलमान खान पठाण, अँड राहुल शिंदे,भगवान सिरस्कर,चंद्रकांत गायकवाड, गणेशराव घोरपडे, युसुफभई आदी उपस्थित होते यावेळी पोलीस निरीक्षक शेषराव खटाने यानी पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## सीसीआय कापूस विक्रीसाठी नोंदणीचे आवाहन

### स्मार्टफोनवर करता येणार सीसीआय कापूस विक्रीची नोंदणी

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सन २०२५-२०२६ या वर्षांमध्ये सीसीआय केंद्रावर कापूस विक्री करण्यासाठी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईल वरील कपास निगम या ॲपद्वारे स्वतःची नोंदणी करण्याचे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती सोनपेठ च्या वतीने करण्यात आले आहे.
शेतकऱ्यांना आपला कापूस विक्रीसाठी प्रत्येक वर्षी अनंत अडचणीच्या सामना करावा लागतो. एवढे करूनही ऐनवेळी कापूस विक्रीसाठी अडचण निर्माण झाल्यास शेतकरी आपला कापूस कवडीमोल भावाने व्यापाऱ्याला विकत असतात. त्यासाठी योग्य व किफायतशीर भावाने कापूस विक्रीसाठी सीसीआय केंद्रावर कापूस विक्रीसाठी पूर्व नोंदणी करावी लागते. सदरची नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांना गतवर्षी खूप अडचणी आल्या होत्या. त्यातून अनेकांची नोंदणी राहूनही गेली तर काहींनी नोंदणी अभावी आपला कापूस व्यापाऱ्यांना विक्री केला. यावेळी कापूस उत्पादित शेतकऱ्यांसाठी सीसीआय कंपनीकडून ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया सुरू केली असून त्यासाठी शेवटची तारीख ३० सप्टेंबर आहे. शेतकऱ्यांना आता ही नोंदणी घरबसल्या आपल्या मोबाईल वरून करता येणार आहे. त्यासाठी स्मार्ट फोनवरील प्ले स्टोअर वरून कपास किसान ॲप डाऊनलोड करावा आणि त्यामध्ये अचूक माहिती भरून आपली नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. जेणेकरून येत्या हंगामातील कापूस उत्पादित शेतकऱ्यांना आपला कापूस सीसीआय ला विक्रीसाठी अडथळा निर्माण होणार नाही. ही नोंदणी करण्यासाठी दि.१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे दिलेल्या मुदतीमध्ये शेतकऱ्यांनी आपली नोंदणी करण्याचे आवाहन सोनपेठ कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दशरथ सूर्यवंशी व सचिव अशोक भोसले यांनी केले आहे.




## वंदे मातरम गणेश मंडळाचा जिंतूरात आकर्षक देखावा



**जिंतूर,/प्रतिनिधी-** वंदे मातरम् गणेश मंडळ येलदरी रोड येथे हे जिंतूर शहराचे एक आकर्षित मंडळ होत आहे. जिंतूर शहरात वंदे मातरम् गणेश मित्र मंडळाच एक अनोखा व स्तुत्य उपक्रम राबविण्यात येतआहे.
या मंडळाचे विशेष वैशिष्ट्ये जिंतूर तालुक्यातच नव्हे तर परभणी जिल्ह्यात स्तुत्य आहे, हे मंडळ गेल्या २४ वर्षापासून जिंतूर शहरात पर्यावरण पूरक पूर्णतः नैसर्गिक सानिध्यातल्या साहीत्यापासून गणेश मूर्ती तयार करतात अर्थात स्थापन करून शहरास नव्हे तर जिल्ह्यास नेहमी एक वेगळा बोध देण्याचा प्रयत्न करतात या मंडळाची या वर्षीची मूर्ती ही खूपच आकर्षक आहे विशेषता ही मूर्ती सूप, टोपली, डाल आणि बांबू सारख्या साहित्य पासून तयार करण्यात आली आहे आणि शहराच एक लक्ष केंद्रित करण्याचं काम करत आहे.
या मंडळाचे संस्थापाक अध्यक्ष स्वर्गीय मुंजाभाऊ रोकडे पाटील यांच्या संकल्पनेतून ही मंडळ विशेष कार्य करत असतेच या वर्षीचे या मंडळाचे मार्गदर्शक :- दिलीपरावजी दुधगावकर , गंगाप्रसादजी घुगे,अरविंद भाऊ कटारे, सल्लागार:- सतीश जोरगेवार रमेश अण्णा संगेकर, अमित राठोड,सम्राट अंभोरे,अंकुश चव्हाण,राजेश जोरगेवार या वर्षी अध्यक्षस्थानी राहुल राऊत, उपाअध्यक्ष रामेश्वर चव्हाण ,कोषाध्यक्ष शिवराज हळदे, गोपाळ रोकडे, राजू हुलगुंडे, व इतर आजी माजी पदाधिकारी, सदस्य,कार्यकर्ते यांच्या मेहनतीने व पुढाकाराने हे मंडळ दर वर्षी काही तरी नवीन करत असते गेल्या २४ वर्षापासू हे मंडळ काही तरी नवीन करतच आले पण या मंडळाकडून एक खंत व्यक्त होत आहे की कधी ही प्रशासनाचे या मंडळाकडे कधी लक्ष नाही गेले अथवा या मंडळाच्या दरवर्षी विशेष असलेल्या पर्यावरण पूरक गणपतीच्या मूर्ती कडे लक्ष नसल्याने व प्रशासनात यांच्या स्तुत्य उपक्रमाची नोंद नाही आणि असेच असल्यास प्रशासनाच्या व सरकारच्या गणेश उत्सव योजना या कागदावरच राहतील किंवा आहेत हे सिद्ध होईल.

## एक्सपायरी बिस्किटांची सोनपेठात सर्रास विक्री

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** मागील अनेक दिवसापासून सोनपेठ येथील काही दुकानदारांकडून विविध कंपन्यांच्या बिस्किटसह लहान मुलांच्या खाण्याचे इतर सीलबंद गोड पदार्थांची मुदत (एक्सपायरी) तारीख संपूनही सर्रास विक्री सुरू आहे. त्यातून आम्ही त्यांच्या आरोग्यात धोका पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे या गंभीर बाबीकडे अन्न व भेसळ प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

सध्या लहान मुलांच्या विविध खाण्याच्या सिलबंद वस्तू बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.तसेच अनेक नामांकित कंपन्यांचे वेगवेगळे बिस्किट पुडे देखील सोनपेठ शहरातील किराणा व मेडिकल दुकानावर विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत.सोनपेठ शहरातील एक दुकानातून येथील एका नारीकाने पतंजली चे १० रुपयांच्या किमतीची दोन बिस्किट पुडे मंगळवारी खरेदी केले. त्या पुढ्यावरील एक्सपायरी तारीख मे २०२५ आहे. अशाच प्रकारचे अनेक बिस्कीट,तोस व ईतर खाद्याच्या पॅकिंग वस्तूंची सर्रास विक्री केली जात आहे.याकडे अन्न व भेसळ प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.
अन्न व भेसळ खाते म्हणजे, अन्न भेसळ प्रतिबंधक आणि अन्न सुरक्षा संबंधित शासकीय विभाग आहे, ज्याला महाराष्ट्र राज्यात अन्न व औषध प्रशासन विभाग () म्हणून ओळखले जाते. या विभागाचे काम अन्नामध्ये होणारी भेसळ रोखणे, अन्न उत्पादनांची गुणवत्ता तपासणे आणि जनतेला सुरक्षित अन्न उपलब्ध करून देणे आहे.




### अन्न व भेसळ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाचा परिपाक

अन्न भेसळ म्हणजे काय?
अन्न भेसळ म्हणजे अन्नात आर्थिक फायद्यासाठी कमी दर्जाचे किंवा निकृष्ट दर्जाचे पदार्थ मिसळणे किंवा त्यात अघोषित घटकांचा समावेश करणे. भेसळयुक्त अन्न खाल्ल्याने गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.
अन्न व औषध प्रशासन विभागाची भूमिका
अन्न सुरक्षा:
हा विभाग अन्न उत्पादनांच्या सुरक्षिततेची खात्री देतो आणि भेसळीपासून जनतेचे संरक्षण करतो.
गुणवत्ता नियंत्रण:
अन्नाच्या गुणवत्तेचे नियमित तपासणी केली जाते आणि भेसळ आढळल्यास कारवाई केली जाते.
कायद्याची अंमलबजावणी:
अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यांची अंमलबजावणी करणे हे या विभागाचे कार्य आहे.
परंतू सोनपेठ येथील या गंभीर बाबीकडे सदर प्रशासनाचा कान्हा डोळा होताना दिसून येत आहे. याप्रकरणी संबंधित भागाकडून तात्काळ योग्य ती कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

## देवगिरी बँक कर्मचारी संघाच्या गणेशोत्सवात मान्यवरांचा सहभाग

### देवगिरी बँक कर्मचारी संघातर्फे भव्य गणेशोत्सवाचे आयोजन




छत्रपती संभाजीनगर - येथील देवगिरी नागरी सहकारी बँक लि. मध्ये प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. बँकेचे मा. अध्यक्ष श्री किशोरदादा शितोळे यांच्या हस्ते गणपती बाप्पाची विधिवत स्थापना करण्यात आली. गणेशोत्सव हा देवगिरी बँकेच्या परंपरेचा एक महत्त्वाचा भाग असून, प्रत्येक वर्षी बँकेतील अधिकारी, कर्मचारी आणि सभासद या सोहळ्यात सहभाग घेतात दि २८ ऑगस्ट रोजी गणरायाच्या महाआरतीचा सोहळा महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री मा. श्री. अतुल सावे व माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री मा. श्री. भागवत कराड यांच्या हस्ते पार पडला. त्यांनी आपल्या भाषणात गणेशोत्सवाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे आणि सदस्यांचे अभिनंदन केले आणि बँकेच्या उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्राचे कार्यकर्ते हरिषजी कुलकर्णी, तसेच शहरातील प्रसिद्ध उद्योजक राग भोगले, विवेक देशपांडे, रवि वैद्य, समीर मालखरे, सौरभ चौधरी, अरुण पेरे सुर्यभान भोसले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष किशोरदादा शितोळे, उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक सजनराव मते. प्रशात देशपांडे. सुरेश जगाडे यांची उपस्थिती होती. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण नांदेडकर उप मुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे, रुपेंद्र कोपाळकर, कर्ज विभाग प्रमुख काशिनाथ दापके यांच्याराह बँकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

## सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा



सोयगाव,दि.३० ऑगस्ट - अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमास प्राचार्य डॉ.शिरीष पवार अध्यक्षस्थानी होते.तर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,पदव्युत्तर समन्वयक डॉ.शत्रुघन भोरे, कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील,पंकज गावित उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ.निलेश गाडेकर यांनी विद्यार्थ्यांना खेळांविषयी सखोल मार्गदर्शन केले.त्यांनी क्रीडा हा शारीरिक व मानसिक विकासाचा आधार असून जीवनात शिस्त,संघभावना आणि आत्मविश्वास निर्माण करणारा घटक असल्याचे सांगितले.तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच खेळातही प्रावीण्य मिळवावे असे आवाहन केले.विद्यार्थ्यांमध्ये खेळांविषयी जागृती निर्माण व्हावी म्हणून महाविद्यालयात गोळाफेक, क्रिकेट,बुद्धिबळ,खो-खो व कबड्डी,थलेटिक्स या क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.निलेश गावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.सुनील चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक,विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हॉकी सम्राट मेजर ध्यानचंद यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ काशिनाथ पाटील जाधव विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात



कन्नड : दि.३० ऑगस्ट - जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या स्मृती प्रित्यर्थ राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रशासकीय अधिकारी सचिन भामरे यांनी विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद यांच्या आयुष्याचा थोडक्यात परिचय करून देत हॉकी क्षेत्रातील त्यांचे अप्रतिम योगदान अधोरेखित केले. हॉकीच्या मैदानावर भारताला विश्वमान मिळवून देणारे ध्यानचंद हे खऱ्या अर्थाने भारताचे क्रीडायोद्धा होते. त्यांचे जीवन विद्यार्थ्यांनी आदर्श म्हणून घेणे गरजेचे आहे, असे भामरे यांनी सांगितले. या निमित्ताने विद्यालयातील वातावरण दिवसभर क्रीडामय झाले होते. कबड्डी, खो-खो, लगोरी, आट्यापाट्या अशा पारंपारिक खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. खेळातून टीमवर्क, शिस्त, क्रीडाभाव आणि चिकाटी या मूल्यांचा अंगीकार करण्याचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. खेळताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह स्पष्टपणे दिसत होता. कार्यक्रमास जगमोहन मुंडवाडकर, दीपक जाधव, भरत पवार, ज्ञानेश्वर नायकुडे, दत्तात्रय गायके, योगेश कुमावत, सुरज हिरे, सुनीता दाबके, सुनीता बाविस्कर, सीमा राठोड, संतोष आग्रे, सुभाष जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवान म्हैसमाळे यांनी केले.

## जेबीएलने सणासुदीचा उत्साह वाढवला

पुणे, ऑगस्ट २०२५- भारतात बहुप्रतिक्षित सणासुदीचा हंगाम सुरू होत असताना, जेबीएल इंडियाने आपली ३६०-डिग्री मार्केटिंग मोहीम - साउंड ऑफ सेलिब्रेशन्स सादर केली आहे. या मोहिमेत प्रादेशिक संगीताचा आनंद साजरा करणारे एक खास गाणे आणि दमदार नवीन उत्पादनांची श्रेणी सादर केली आहे, ज्यात जेबीएल पार्टीबॉक्स एन्कोर २, पार्टीबॉक्स एन्कोर इसेन्शियल २, पार्टीबॉक्स ५२०, चार्ज ६, फ्लिप ७, आणि जेबीएल बार १३०० यांचा समावेश आहे. ही उत्पादने रिटेल, डिजिटल आणि सांस्कृतिक स्तरांवर आवाज, भावना आणि नवनिर्मिती यांचे मिश्रण घडवून आणतात. या सणासुदीच्या हंगामासाठी जेबीएल इंडियाने 'साउंड ऑफ सेलिब्रेशन्स' हे खास गाणे डिजिटल मोहिमेद्वारे सादर केले आहे. हे गाणे भारतातील विविध सणांतील वैशिष्ट्यपूर्ण आवाज टिपते. गणेश चतुर्थीच्या ढोलांच्या गजरापासून, दुर्गा पूजेतील ढाकच्या तालापर्यंत आणि ओणमच्या उत्साही चेंडा वाद्यापर्यंत, प्रत्येक प्रदेशातील संगीत एकात्मतेच्या भावनेला कसा हातभार लावते हे हे गाणे अधोरेखित करते. हे गाणे प्रसिद्ध संगितकार सेज अन द बिट यांनी संगीतबद्ध केले आहे. यात देशभरातील कलाकारांचा सहभाग आहे- एमसी कूपर (केरळ/ओणम), एमसी गावठी (महाराष्ट्र/गणेश चतुर्थी), संजिता भट्टाचार्य (पश्चिम बंगाल/दुर्गा पूजा) आणि श्रेया जैन. हे गाणे यूट्यूबवर प्रदर्शित झाले असून, जेबीएलच्या सोशल मीडिया चॅनेल्सवरही प्रसारित केले आहे.

## स्टार युनियन दाई-इची लाइफ इन्शुरन्सने महा मोदक अभियानाचे अनावरण केले.

नाशिक : स्टार युनियन दाई-इची लाइफ इन्शुरन्स (एसयूडी लाईफ) ने पुण्यात सुरू असलेल्या गणेशोत्सवानिमित्त आपले नवे अभियान एसयूडी लाईफ महा मोदक सुरू केले आहे. या उपक्रमाचा उद्देश राज्यातील सर्वात मोठ्या उत्सवासोबत सांस्कृतिक नाळ मजबूत करून कुटुंबांचे संरक्षण व जीवन समृद्ध करण्याच्या ब्रँडच्या मूलभूत मूल्यांना अधोरेखित करणे तसेच प्रादेशिक स्तरावरील बांधिलकी अधिक दृढ करणे हा आहे. ३० ऑगस्ट २०२५ ते ५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत महा मोदकच्या माध्यमातून समाजाशी अर्थपूर्ण संवाद साधला जाणार आहे. या उपक्रमाद्वारे एसयूडी लाईफच्या उपाययोजनांबद्दल जनजागृती केली जाईल, इच्छुक सल्लागारांसाठी करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील तसेच पर्यावरणीय जबाबदारीचे महत्त्वही अधोरेखित केले जाईल.

## के ब्युटी चे यूकेमध्ये ऐतिहासिक पदार्पण, स्पेस एनकेमध्ये खास सादरीकरण

मुंबई : सौंदर्य प्रसाधनांच्या क्षेत्रात एक नवा महत्त्वाचा टप्पा नोंदवत के ब्युटी ने यूकेमधील स्पेस एनके येथे दिमाखात पदार्पण केले आहे. अभिनेत्री आणि ख्यातनाम व्यक्तिमत्त्व कतरिना कैफ आणि भारतातील आघाडीच्या ब्युटी आणि लाइफस्टाइल व्यासपीठ नायका यांच्या सहकार्यातून हा ब्रँड निर्माण झाला आहे. के ब्युटी हा भारतात स्थापन होऊन स्पेस एनकेमध्ये सादर झालेला पहिला ब्रँड आहे. स्पेस एनके हे यूकेमधील एक अत्यंत मानाचे रिटेलर्स आहेत जिथे दक्षिण आशियाई समाज आणि इतर सर्वांसाठीच खास तयार करण्यात आलेले नवे, सर्वसमावेश ब्युटी ब्रँड्स सादर होतात. २०१९ मध्ये स्थापन झालेल्या के ब्युटी चा पायाच परफॉर्मन्स, काळजी आणि सर्वसमावेशकतेवर उभारण्यात आला आहे. सौंदर्य म्हणजे फक्त कशाचा तरी भाग असणे नव्हे तर आपले खरे व्यक्तिमत्त्व साजरे करणे या विचाराचा पुरस्कार या ब्रँडकडून केला जातो. इट्सके टू बी यू या आपल्या संदेशातून हा ब्रँड आत्मविश्वासाला प्रेरणा देतो.

## समाधान गायकवाड यांनी सोयगाव येथे नगरपंचायत स्तरावर सर्वोत्कृष्ट नागरी सेवा केल्याबद्दल गौरव



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० ऑगस्ट

येथील नगरपंचायत सोयगाव येथे नगरपंचायत स्तरावर सर्वोत्कृष्ट नागरी सेवा दिल्याबद्दल सोयगाव नगरपंचायतचे कर्मचारी समाधान गायकवाड यांना छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्फत प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयाचा नगर विकास विभागामार्फत प्रथमच जिल्ह्यातील विविध नगर परिषदा व नगरपंचायती मधील उत्कृष्ट सेवा देणाऱ्या कर्मचारी यांचा सत्कार छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तसेच जिल्हा नगरविकास विभागाचे प्रमुख सहआयुक्त रफिक सय्यद,सहाआयुक्त ऋषिकेश भालेराव,वैजापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी बिघोत सर,सोयगाव नगरपंचायतचे मुख्याधिकारी संभाजी देशमुख व व इतर सर्व नगरपंचायत स्तरावरील इतर सर्व अधिकारी व कर्मचारी हजर होते.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कोअर बँकिंग प्रणालीचे सप्टेंबर मध्ये एकत्रीकरण

छत्रपती संभाजीनगर, दि ३० ऑगस्ट - अर्थ मंत्रालय तथा वित्तीय सेवा विभाग, भारत सरकार यांच्यामार्फत दिनांक ०७एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रानुसार, तत्कालीन महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि तत्कालीन विदर्भ कोकण ग्रामीण बँक या बँकांचे एकत्रीकरण होऊन दिनांक ०१.०५.२०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी नवीन 'महाराष्ट्र ग्रामीण बँक' अस्तित्वात आली आहे. पूर्वी प्रमाणेच महाराष्ट्र ग्रामीण बँक हि संपूर्ण शासकीय मालकीची बँक असून या बँकेचे भाग भांडवल हे भारत सरकार, महाराष्ट्र राज्य सरकार व बँक ऑफ महाराष्ट्र यांचे आहे.

या एकत्रीकरणाच्या अनुषंगाने, विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या संगणकीय प्रणालीचे म्हणजेच कोअर बँकिंग सेवा प्रणालीचे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कोअर बँकिंग सेवा प्रणाली सोबतची एकत्रीकरण प्रक्रिया दिनांक १३ सप्टेंबर २०२५ पासून ते १६ सप्टेंबर २०२५ पर्यन्त नियोजित करण्यात आलेली आहे. या एकत्रीकरण प्रक्रियेच्या कालावधीत सर्व डिजिटल व इतर बँकिंग सेवा जसे की ATM, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, UPI, RTGS, NEFT, IMPS, DBT, VKYC, आधार-आधारित पेमेंट प्रणाली (AePS), धनादेश वटविणे (Cheque Clearing), स्थायी सूचनांसह नियत आदेश (Standing Instructions Mandates) या सर्व सेवा कालावधीत तात्पुरत्या विलंबित किंवा खंडित होऊ शकतात. हि एकत्रीकरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या सर्व सेवा पुन्हा पुर्ववतपणे सुरू होतील.

यामुळे होणाऱ्या गैरसोयीबद्दल बँक दिलगीर आहे असे बँकेच्या वतीने कळविण्यात आले आहे, तसेच वरील कालावधीत येणाऱ्या तातडीच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी पूर्वनियोजित व्यवस्था करण्याची ग्राहकांना नम्र विनंती बँकेच्या मार्फत करण्यात येत आहे. कृपया कोणतीही अडचण, शंका किंवा तक्रार असल्यास बँकेच्या नजीकच्या शाखेशी अथवा www.mahagramin.in या अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधावा, महाराष्ट्र ग्रामीण बँक आपल्या ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे. तसेच दिनांक १५ सप्टेंबर पासून सर्व सेवा ग्राहकांसाठी पुन्हा सुरळीत होतील व त्या अधिक तत्पर व ग्राहकांसाठी अधिक सोयीच्या असणार आहेत असे बँकेच्या मार्फत कळविण्यात आले आहे.

## वरूनराजाच्या साक्षीने श्रीगणपती अथर्वशीर्ष पठन



तभा वृत्तसेवा

पैठण दि ३०:- श्रीसिद्धिविनायक व्यापारी गणेश मंडळ आयोजित व संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित श्रीगणपती अथर्वशीर्ष पठन वरुण राजाच्या साक्षीने मोठ्या संख्येने महिलांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

भाजपा प्रदेश सदस्या तथा संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा रेखाताई कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली श्रीगणपती अथर्वशीर्ष सामूहिक पठन चे आयोजन करण्यात आले होते. पाऊस सुरू असताना देखील या वेळी मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष किशोर चौहान, स्वागताध्यक्ष सोमनाथ परदेशी, सचिव राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष जितूभाऊ परदेशी,व्यापारी महासंघाचे पवन लोहिया, बलराम लोळगे, अध्यक्ष स्वदेश पांडे, सचिव उमेश तट्टू, कुणाल खताडे, गणपत मिटकर आदींनी सर्व महिला भगिनींचे स्वागत केले. किरण गाडेकर यांनी सूत्रसंचलन केले. संतोष देवा जोशी यांनी पौरोहित्य केले. शालिवाहन पतसंस्थेच्या वतीने सर्व महिलांना भेटवस्तू देण्यात आली.

शिवसेना महिला शहर अध्यक्षा वैशालीताई परदेशी, माजी नगराध्यक्षा राखी परदेशी, सुप्रिया जोशी, राखी कुलकर्णी, सुरेखा पाटील, ऐश्वर्या धर्माधिकारी, मीनाक्षी मिटकर, संगीता खरे, प्रभा देशपांडे, मिना वैद्य, गंगा पोटे, इंदु ढकणे, शैला कबाडे, बाबीता वाघमोडे, कल्पना सर्जे, चित्रा कुलकर्णी, रोहिणी कुलकर्णी, सूचित्रा जोशी, सुदैवी जोशी, रूपाली होणारे, वैशाली बागले आदींसह सर्व उपस्थित महिलांच्या हस्ते श्री सिद्धीविनायकाची महाआरती करण्यात आली.

## जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे पालक सभा उत्साहात संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० ऑगस्ट

सोयगाव तालुक्यातील उपक्रमशील शाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या प्रेरणेने तसेच गटशिक्षणाधिकारी सोयगाव सचिन शिंदे व केंद्रप्रमुख सोयगाव फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली पालक सभा आयोजित करण्यात आली होती.ही पालक सभा तीन सत्रात आयोजित करण्यात आली होती.या पालक सभेचे अध्यक्ष म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष मनोज आगे होते. पालक सभेस मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी पाहिल्या सत्रात पालकांना शाळेत घेण्यात येणारे उपक्रम जसे आनंददायी शनिवार, दप्तर मुक्त शाळा,पाढे पाठांतर, सामान्य ज्ञान,मोफत गणवेश,पाठ्यपुस्तके ,बूट,मोजे,पोषण आहार,दशसूत्री कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात येणारे विविध उपक्रम यांची माहिती पालकांना दिली.तसेच शाळेचे सहशिक्षक गोपाल चौधरी यांनी शिष्यवृत्ती परीक्षा याचे मार्गदर्शन शाळेतून सुरू असून यावर्षी वर्ग ४ थीतील विद्यार्थ्यासाठी शिष्यववृत्ती परीक्षा होणार असल्याचे सांगितले. यानंतर पालक सभेस प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित असलेले सोयगाव येथिल समाजसेवक राजेंद्र दुतोंडे यानी विद्यार्थी सुरक्षितता तसेच लोकसहभाग,विद्यार्थी गुणवत्ता यामध्ये पालकांचा सहभाग याविषयी मार्गदर्शन केले.प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार भरत पगारे यांनी गोरगरिबाच्या शिक्षणासाठी जिल्हा परीषद शाळा टिकाविणे ही काळाची गरज असून रामजीनगर शाळा ही सोयगाव तालुक्यातिलच नव्हे तर जिल्ह्यातील उपक्रमशिल शाळा असून शाळेच्या विकासासाठी सोयगाव सह तालुक्यातील पत्रकार बांधव केव्हाही सहकार्यास तयार असल्याचे सागुन रामजीनगर येथील शालेय व्यवस्थापन समिती,पालक,विद्यार्थी,शिक्षक याच्या पाठीवर कौतुकाची थाप आपल्या मनोगतातून टाकली.यावेळी काळेनगर येथील रहिवासी तथा समाजसेवक राजू कुडके यांनी शाळेस एक सीसीटीव्ही कॅमेरा भेट म्हणून दिला असून लवकरच शाळेत लावण्यात येईल असे जाहीर केले.यावेळी शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा वैशाली पवार,सदस्या मनिषा जेठे,सदस्य एकनाथ इंगळे,मातापालक संघाच्या अध्यक्षा वैशाली इगळे,पालक शंकर जेठे,ज्ञानेश्वर सोनवणे,सरला इंगळे,रेखा बाविस्कर,विद्या कळवत्रे,सखुबाई सुरे,वंदना दाडगे,सुशिला काकफळे,गुफाबाई इगळे,पदमाबाई कुडके,विनोद इगळे,रघुनाथ इगळे,मुकुंदा बावस्कर सटवा पोतरे,लता गायकवाड,संध्या पगारे,संगिता खिल्लारे याच्यासह पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.यावेळी महिला पालक वर्गाची उपस्थिती लक्षणिय होती.सभेचे सूत्रसंचलन गोपाल चौधरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी इतर शिक्षकांनी मदत केली.

## गंगापूरातील मानाचा संस्थान गणपती गणेशोत्सव उत्साहात

गंगापूर दि.३० - गंगापूर शहरात मोठ्या भक्तिभावाने व पारंपरिक उत्साहात संस्थान गणपती गणरायाची स्थापना करण्यात आली. गणेश मूर्तीच्या आगमनावेळी ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. श्री संस्थान गणपती गणेशोत्सव अध्यक्ष गोकूळ संजय शिंदे उपाध्यक्ष-अभय मनोज शिंदे शिवराज किशोर पवार खजिनदार प्रसाद साईनाथ मातकर कोषाध्यक्ष योगेश अनिल जाधव सहकोषाध्यक्ष विनायक रमेश शिंदे सचिव चेतन शिवनाथ खैरे सहसचिव ऋषि अनिल जाधव सल्लागार - आकाश मोरे,धनराज जाधव,अमोल जाधव,भगवान खैरे , महेश शिंदे,अमोल शिंदे ,सोमा शिंदे ,शुभम शर्मा . या वेळी विधी वेदोपचारांच्या मंगलमय वातावरणात पार पडला. या वेळी शहरातील विविध मित्र मंडळांचे कार्यकर्ते, समाजातील मान्यवर, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शिवतांड्यात तांडा विकास गटाच्या पुढाकाराने १५० जनावरांना लंपी लसीकरण



कन्नड : दि.३० ऑगस्ट - शिवतांडा येथे तांडा विकास गटाच्या माध्यमातून २९ ऑगस्ट रोजी लंपी आजाराविरुद्ध लसीकरण मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत तब्बल १५० जनावरांना लसीकरण करण्यात आले.नागपाडा नेबरहूड हाऊस कन्नड ही संस्था २०२५ मध्ये तालुक्यातील दहा तांड्यांची निवड करून शिक्षण, आरोग्य, कौशल्य, रोजगार, पर्यावरण आणि स्वच्छता या क्षेत्रांत विविध उपक्रम राबवत आहे. त्याच अनुषंगाने शिवतांड्यात लंपी आजारामुळे त्रस्त झालेल्या जनावरांचे संरक्षण करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात आली.

लसीकरण सकाळी नऊ वाजता सुरू होऊन दुपारी तीनपर्यंत चालले. जवळजवळ १५० जनावरांना लसीकरण करण्यात आले. मोहिमेसाठी पशुवैद्यकीय अधिकारी, नागपाडा संस्थेची टीम, ग्रामपंचायत पदाधिकारी व स्थानिक तरुण मंडळींचे सहकार्य लाभले.

या उपक्रमात तांडा विकास गटाचे नायक इंदल चव्हाण तसेच समिती सदस्य सक्रियपणे सहभागी झाले. त्यांनी या उपक्रमासाठी आरोग्य विभाग व नागपाडा संस्थेचे आभार मानले.

## जाहिर समन्स

**मा. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद श्री.ए.ए. कळमकर, ४थे सह दिवाणी न्यायाधिश, क-स्तर, गंगापूर यांचे न्यायालयात**

दिवाणी प्रक्रिया संहिता आ. ५, नि.२० प्रमाणे

नियमीत दिवाणी दावा क्र. १२६/२०१६

ओम चंदन बैनाडे विरूद्ध चंदन कपूरचंद बैनाडे व इतर

पुढील तारिख : २४/०९/२०२५

प्रति,

२. मदन कपूरचंद बैनाडे रा. पेंडापूर ता.गंगापूर जि. औरंगाबाद

याअर्थी, ओम चंदन बैनाडे यांनी तुमच्या विरूद्ध या न्यायालयात दावा दाखल केला आहे म्हणून, सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्ही दि. २४/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता या न्यायालयात जातीने किंवा ज्यास यथायोग्य सुचना दिलेल्या असुन जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचे उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तरे देऊ शकणारी व्यक्ति ज्यांच्या बरोबर असेल. अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलवण्यात येत आहे, आणि उक्त दिवशी तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा आणि तुमचा बचाव किंवा वजावटीची हक्क मागणी किंवा प्रतिहक्क मागणी ज्याच्यावर आधारलेली असेल असे तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करण्याचा निर्देश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे आणि तुमच्या बचावाच्या किंवा हक्क मागणीच्या पृष्ठयर्थ पुरावा म्हणून तुम्ही तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेल्या किंवा नसलेल्या अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजावर अवलंबून असाल त्याबाबतीत तुम्ही प्रतिवादपत्रासोबत जोडावयाच्या यादीमध्ये अशा दस्तऐवजांची नोंद केली पाहिजे.

करिता वर नमूद केलेल्या दिवशी तुम्ही हजर न राहील्यास, तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होवून निर्णय देण्यात येईल. याची दखल घ्यावी.

आज दिनांक ३०/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशान्वये

कनिष्ठ लिपिक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा.एम.बी.पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर सोयगाव यांच्या न्यायालयात.**

सीवील.एम.ए. नंबर २११/२०२५

अर्जदार - लटकनबाई गोविंदा दुधे, उर्फ लटकनबाई गोविंदा गढरी, वय ८४ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोहळाई ता. सोयगाव जि. छ. संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार - १) अलकाबाई शंकर गढरी, उर्फ अलकाबाई शंकर परदेशी, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा, बदरखे ता. पाचोरा जि. जळगाव २) दिपक शंकर गढरी, उर्फ दिपक शंकर परदेशी वय ३५ वर्षे, धंदा वैद्यकिय व्यवसाय, रा. वरीलप्रमाणे ३) कविता शंकर गढरी, उर्फ कविता शंकर परदेशी वय २५ वर्षे, धंदा घरकाम, रा, वरीलप्रमाणे ४) अस्मिता सचिन परदेशी, वय ३२ वर्षे, धंदा परिचारिका, रा. महात्मा फुले रोड, गायकवाड वाडी जवळ, रूम नंबर ४०२, विष्णु नगर, डोबिवली पश्चिम, ता. कल्याण जि.ठाणे, पिन. ४२१२०२ ओमसाई कृपा हॉऊसिंग सोसायटी, चौथा माळा,

विषय :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदाराचे वकिल ॲड. एम. एन. जाधव यांच्या मार्फत अर्जदार यांना मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. सोयगाव न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी हे मौजे मोहळाई ता. सोयगाव जि. छ. संभाजीनगर येथील रहिवाशी होते व त्यांचा दि. २३/०५/१९९९ रोजी मौजे मोहळाई ता. सोयगाव येथे मृत्यु झालेला आहे. मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी यांचे मृत्यु प्रमाणपत्र प्रस्तुत अर्जासोबत जोडलेले आहे. अर्जदार हि मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी यांची आई असुन गैरअर्जदार क्र. ०१ हि मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी यांची पत्नी आहे तसेच गैरअर्जदार क्र. ०२ हा मुलगा असुन, गैरअर्जदार क्र. ०३ व ०४ ह्या मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी यांच्या मुली आहेत. अर्जदार व गैरअर्जदार क्र. ०१ ते ०४ यांच्या व्यतिरीक्त मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. गैरअर्जदार क्र. ०१ ते ०४ हे सुध्दा मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी यांच्या कायदेशीर वारस असून प्रस्तुत अर्ज दाखल करणे कामी त्यांनी प्रस्तुत अर्जावर सह्या करण्यास व मा. कोर्टात प्रस्तुत अर्ज दाखल करण्यासाठी येण्यास नकार दिल्याने त्यांना प्रस्तुत अर्जात गैरअर्जदार क्र. ०१ ते ०४ करण्यात आले आहे. अर्जदार यांना मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी यांच्या वारस प्रमाणपत्राची शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच महसुल कामासाठी आवश्यकता असल्याने अर्जदारांना सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल करण्याचे कारण घडले आहे. मयत शंकर गोविंदा गढरी उर्फ शंकर गोविंदा परदेशी यांना अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ते ४ हे वारस नाही. असे कोणास समजावण्याचे असेल व वारस प्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कोणास आक्षेप उजर हरकती असेल अशानी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत आक्षेप उजर हरकती या न्यायालयात हजर होऊन सादर कराव्यात जर मुदतीत कोणी आक्षेप उजर हरकती न दिल्यास अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ३०/०८/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख दि. १२/०९/२०२५ विभागीय लिपीक :

आदेशावरून

सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगाव.

## अग्रलेख...

# संघाचा अनोखा शब्दयज्ञ

शंभर वर्षे म्हणजे कोणत्याही व्यक्तीच्या आणि संस्था तसेच संघटनेच्या जीवनातील मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. असे भाग्य फार कमी व्यक्तींच्या तसेच संस्था संघटनांच्या नशिबात असते. शंभर वर्षांचा प्रवास हा तसा सहज आणि सोपा नसतो. व्यक्ती असो की संघटना त्यांना अनेक प्रकारच्या टीकेला, कष्टांना, संकटांना, उपेक्षांना, हालअपेष्टांना तसेच आरोप-प्रत्यारोपांना सामोरे जावे लागते. संस्था आणि संघटनेच्या तुलनेत व्यक्तीच्या आयुष्यात याचे प्रमाण तुलनेत कमी असते. मात्र या आव्हानांचा जे सामना करू शकतात, तेच काळाच्या कसोटीवर उतरतात, शतकपूर्तीच्या प्रवासात यशस्वी होतात, समाजजीवनात आपल्या कर्तृत्वाचा अनमोल असा ठसा उमटवतात.

रा. स्व. संघाच्या स्थापनेला १०० वर्ष पूर्ण होत आहे. यंदाच्या विजयादशमीपासून २०२६ च्या विजयादशमीपर्यंत संघ आपला शताब्दी महोत्सव साजरा करणार आहे, त्याचा श्रीगणेशा झाला आहे. या प्रवासात व्यक्तीच्या तुलनेत संस्था, संघटनेला अधिक प्रमाणात सिंहावलोकन करावे लागते. आपला आतापर्यंतचा प्रवास, त्यात आलेले अडथळे आणि ज्या ध्येयासाठी स्थापना झाली, त्याच्या किती जवळ आपण पोहोचलो वा ते लक्ष्य गाठले का, गाठले नसेल तर आपण कुठे कमी पडलो आणि गाठले असेल तर आता पुढे काय करायचे, याचा आढावा घ्यावा लागतो. रा. स्व. संघाचा शंभर वर्षांचा चैतन्यदायी, गौरवपूर्ण आणि आशादायक प्रवास देशातील समस्त हिंदूंसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा म्हटला पाहिजे. रा. स्व. संघाने आपल्या शताब्दीनिमित्त देशवासीयांशी संपर्क आणि संवाद साधण्याचे ठरवले आहे. हे संघाच्या प्रकृतीला साजेसेच म्हटले पाहिजे. देशभरात असे चार महत्त्वाकांक्षी संवाद कार्यक्रम होणार असून त्यातील पहिला कार्यक्रम राजधानी दिल्लीच्या विज्ञान भवनात मोठ्या उत्साहात नुकताच पार पडला. परम् पूजनीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी या त्रिदिवसीय कार्यक्रमातून संघाबाबत जनमानसाला पडणाऱ्या अनेक प्रश्नांना, आक्षेपांना आणि आरोपांना मुद्देसूद आणि समर्पक असे उत्तर दिले. पहिल्या दोन दिवसांत त्यांनी संघाची आतापर्यंतची वाटचाल आणि भविष्यात काय करायचे याचा आराखडा सादर केला, तर तिसऱ्या आणि अंतिम दिनी प्रश्नोत्तर सत्रातून विविध मुद्यांवर संघाची भूमिका स्पष्ट केली. देशातीलच नाही तर जगातील सर्वांत मोठी स्वयंसेवी तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक संघटना म्हणून संघ ओळखला जातो. संघपरिवार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बृहत् संघ परिवारात जवळपास तीन डझन संघटना आहेत. विशेष म्हणजे प्रत्येक संघटनेचा कार्यविस्तार हा राष्ट्रव्यापी आहे. त्यामुळेच आज स्थानिक तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मुद्यावर संघाची भूमिका काय आहे, असा प्रश्न सर्वांना पडतो.

२०१४ नंतर भाजपा सत्तेवर आल्यामुळे संघाला सोन्याचे दिवस आले, असे काही जण म्हणतात. पण ते पूर्ण सत्य नाही तर अर्धसत्य म्हणावे लागेल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या कार्यालयात एक सुविचार त्यांनी लावला आहे. अमेरिका श्रीमंत आहे, म्हणून तेथील रस्ते चांगले नाहीत, तर तेथील रस्ते चांगले आहेत, म्हणून अमेरिका श्रीमंत आहे, या अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती जॉन एफ. केनेडी यांच्या विधानासारखी ही स्थिती आहे. संघाच्या हजारो प्रचारकांनी आणि लाखो नाही तर कोट्यवधी स्वयंसेवकांनी १९२५ पासून केलेल्या त्यागामुळे, कष्टामुळे, समर्पणामुळे आणि बलिदानामुळे भाजपाला आज सोन्याचे दिवस आले, ही वस्तुस्थिती आहे. संघ ही हिंदूंची संघटना म्हणून ओळखली जात असली तरी संघाची हिंदुत्वाची व्याख्या संकुचित आणि मर्यादित नाही. या देशात राहणारे ते सर्व हिंदू; मग ते कोणत्याही धर्माचे आणि पंथाचे असो, अशी संघाची धारणा आणि विश्वास आहे. संघाचे हिंदुत्व हे सर्वसमावेशक तसेच सहिष्णू असे आहे. त्यामुळे कोणत्याही नैसर्गिक आपत्तीच्या वेळी संघ स्वयंसेवक मदतीला धावून जाताना समोरची व्यक्ती कोणत्या धर्माची आणि पंथाची आहे, याचा विचार करत नाही. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी माणुसकीच्या नात्याने वागावे, तशी संघ स्वयंसेवकांची वागणूक असते. त्यामुळेच संघ जर समजून घ्यायचा असेल तर संघाजवळ या, संघात या आणि मगच संघाबद्दलचे आपले मत बनवा, असे आवाहन डॉ. भागवत यांनी केले. कारण एकदा का संघाची ओळख पटली, संघ समजला की जवळ आलेली व्यक्ती संघापासून कधीच दूर होऊ शकत नाही, ती संघाची होऊन जाते. संघाबद्दल काही व्यक्ती आणि संघटनांनी जाणीवपूर्वक गैरसमज पसरवण्याचे काम केले, असे म्हणावे लागेल. अनेक खोट्या प्रकरणांत आणि आरोपांत संघाला अडकवण्याचा प्रयत्न झाला. संघावर बंदी घालण्याचाही प्रयत्न झाला. पण आगीतून सोने झळाळून निघते, तसा संघ प्रत्येकवेळी यातून सहीसलामत बाहेर पडला. देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत संघाचे स्वयंसेवक देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी संघर्ष करत होते. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचा सर्वांगीण विकास व्हावा, भारताने विश्वगुरू व्हावे म्हणून संघ प्रयत्नशील आहे. संघाच्या अथक आणि अव्याहत प्रयत्नामुळे देश आज विश्वगुरुपदाच्या जवळ पोहोचला आहे. त्यामुळेच आज सरसंघचालक म्हणून डॉ. भागवत यांनी केलेले कोणतेही विधान हे वृत्तवाहिन्यांसाठी ब्रेकिंग न्यूज बनते. त्याची राष्ट्रीयच नाही तर आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा होते. हे संघाचे काम वाढल्याचे, संघ सर्वस्पर्शी झाल्याचे द्योतक आहे. कधीकाळी ज्या संघाची उपेक्षा केली जात होती, त्या संघाची आज प्रत्येक मुद्यावर जगाला दखल घ्यावी लागते, हे संघाच्या फक्त वाढलेल्या वयाची नाही तर त्यांच्या वाढलेल्या कामाची मोठी उपलब्धी म्हणावी लागेल.

संघात आतापर्यंत पाच सरसंघचालक होऊन गेलेत. डॉ. हेडगेवार यांनी संघाची स्थापना केली, दुसरे सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर उपाख्य श्रीगुरुजी यांनी संघाला आकार दिला. तिसरे सरसंघचालक मधुकर दत्तात्रय देवरस उपाख्य बाळासाहेब देवरस यांनी संघाचा सर्वव्यापी विस्तार केला. प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या तसेच कुप्प्. सी. सुदर्शनजी यांचेही संघाला सर्वव्यापी आणि सर्वसाक्षी करण्यात अनन्यसाधारण असे योगदान आहे. सहावे सरसंघचालक म्हणून डॉ. मोहनजी भागवत यांनी संघाच्या मंदिररुपी कार्यावर सोन्याचा कळस चढवला, असे म्हटले तर चूक ठरू नये. मात्र असे असले तरी संघ हा व्यक्तिकेंद्री आणि व्यक्तिपूजक नाही तर त्याने भगव्या झेंड्याला आपला गुरू मानले आहे. त्याच भगव्या झेंड्याच्या आधारे संघाने भारताचा प्रवास हिंदू राष्ट्रापर्यंत केला आहे. भारताचे नावच हिंदुस्थान आहे, यापेक्षा हिंदू राष्ट्राचा मोठा पुरावा कोणता असू शकतो? कधी काळी भारतात सोन्याचा धूर निघत होता, दुधाच्या नद्या वाहात होत्या, असे म्हटले जाते. तो गौरवशाली सुवर्णकाळ भारताला पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी संघ झटत आहे, हे आपल्याला विसरता येणार नाही. कधीकाळी संघावर प्रेम करणाऱ्यांची संख्या कमी होती, तर द्वेष करणाऱ्यांची जास्त. पण आता काळाच्या ओघात या तराजूचे पारडे बदलले आहे. संघावर प्रेम करणारे बहुसंख्य झाले, तर राग आणि द्वेष करणाऱ्यांच्या संख्येत सतत घट होत आहे. संघाची कार्यपद्धती, हिंदू-मुस्लिम वाद, तसेच भाजप आणि संघ यांचे संबंध याबाबतच्या सर्व प्रश्नांना डॉ. भागवत यांनी समर्पक उत्तरे दिली. ७५ वर्षांचे निवृत्तीचे वय तसेच भाजपाबाबत संघ काय बोलणार, अशी उत्सुकता सगळ्यांनाच लागली होती. पण भाजपावर संघाचा रिमोट कंट्रोल नाही, भाजपाचे निर्णय ते घेतात, त्यात आमचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप नसतो, हे त्यांनी सांगून टाकले. तसेच ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर निवृत्त होण्याबाबत मी कोणतेही विधान केले नव्हते, असे स्पष्ट करत डॉ. भागवत यांनी या संदर्भातील सर्व अनावश्यक चर्चांना पूर्णविराम दिला. तीन दिवसांच्या या शब्दयज्ञात समापनाची आहुती टाकताना डॉ. भागवत यांनी काही वेळा आपल्या लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन टाकले, तर दुसऱ्या बाजूच्या लोकांचे डोळे उघडण्याचाही प्रयत्न केला, ही याची सर्वांत मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे.


## प्रासंगिक

# अगणित करावे पुण्य...

**विनोद वखरे**

श्री गजानन विजय ग्रंथात श्रीधर काळेला उपदेश करताना श्री गजानन महाराज म्हणतात, 'अगणित करावे पुण्य तेव्हाच होते येथे जनन' पुढे महाराज परदेशाची आस बाळगणाऱ्या श्रीधर काळेला आदेश देताना म्हणतात, 'हिंदुस्थान सोडून कुठेही जाऊ नको.' संत तेची ईश्वर असे असे अनुभवाने सांगणाऱ्या श्री गजानन विजय ग्रंथाचे लेखक श्री दासगणू महाराजांचे हे विचार जर लक्षात घेतले, तर एक प्रश्न वारंवार सतवायचा की, संपूर्ण जगाच्या पाठीवर हिंदुस्थान हा देश इतर देशांच्या तुलनेत त्यावेळी श्री गजानन महाराजांना श्रेष्ठ का वाटला? का आज आपलीच उच्च शिक्षण घेतलेली तरुण पिढी अणि प्रामुख्याने आयटी क्षेत्रातील तरुण आपल्याच भारतात शिक्षण घेतात अशणि अमेरिकेत जाण्याचे स्वप्न रंगवतात?

अमेरिकेत जाण्याची संधी मिळताच या सर्व प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करण्याचे ठरवून मी सॅन फ्रान्सिस्कोच्या विमानतळावर अमेरिकेच्या प्रवासाची सुरुवात केली. सुबक व आखीव रेखीव अशा लाकडाच्या पॉश घरात निवास करताना आपण मधूनमधून अमेरिकेचा पण प्रवास करणार आहोत, या कल्पनेने सुरुवातीला मन सुखावले. मध्यरात्री पावसाच्या आवाजाने जाग आली; पण प्रत्यक्षात झाडांच्या कॅरीमध्ये झाडांना पाणी देण्यासाठी लावलेल्या स्प्रिंकलिंगच्या माध्यमातून थुईथुई कारंजे उडत होते आणि रस्त्यांच्या कडेला गुलाबांच्या, इतर फुलांच्या व गवताच्या मन प्रसन्न करणाऱ्या कॅरीज टवटवीत दिसत होत्या. दरवर्षी गुरुपौर्णिमेच्या दिवशी माझा मुक्काम शेगावला असतो, परंतु अमेरिकेत असल्यामुळे श्री गजानन गुरुरायांचे पूजन आपल्याकडून होऊ शकणार नाही म्हणून मन खिन्न झाले. महाराजांनी माझी मन:स्थिती जाणली व गुरुपूजनासोबतच गुरुपौर्णिमेनिमित्त कॅलिफोर्निया बे एरियाच्या अप्रतिम अशा गजानन मंदिराच्या भव्य सभागृहात अगदी गुरुपौर्णिमेच्या दिवशी सुमारे ७०० भक्तांसमोर माझ्याकडून गायन सेवा घडवून घेतली. प्रत्यक्ष श्री गजानन महाराजांनी दिलेल्या या आशीर्वादासोबतच मी अमेरिकन जीवन प्रवाहात मिसळायला लागलो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भारतातील शाखांच्या प्रमाणेच अमेरिकेतील हिंदूंचे सशक्त संघटन असणाऱ्या हिंदू स्वयंसेवक संघाच्या कॅलिफोर्निया शाखेत जाण्याचा योग आला. अमेरिकेत अणि तेही संघाचे शताब्दी वर्ष असताना तिथे संघाची शाखा याची देही याचि डोळा बघायला मिळाली अणि मन आनंदाने भरून आले. संघाचा भगवा ध्वज, संघ शाखेतील आपल्यासारखीच कार्य पद्धती, संघातील खेळ, हिंदी भाषेतील संवाद हे सर्व पाहिल्यानंतर क्षणभर आपण भारतातच असल्याचा सुखद अनुभव घेतला अणि धन्य झालो.



कॅलिफोर्निया भागातील पॅसिफिक महासागर, चुंबकीय वातावरणाचा आविष्कार असणारा मिस्ट्री स्पॉट, योसीमीटी वॉटर फॉल, हाफ डोम, मिरर लेक, स्वामी नारायण मंदिर आदी बघितले. पॅसिफिक महासागरच्या थंडगार हवेमुळे इथे उन्हाळा जाणवत नाही. अमेरिकन लोकांची शिस्त, निसर्गावर व झाडांवर असणारे त्यांचे प्रेम, घर व रस्त्यावर ते कटाक्षाने पाळत असलेली कमालीची स्वच्छता व त्यांचा व्यावहारिक प्रामाणिकपणा इत्यादी वैशिष्ट्ये मनात भरली. रस्त्यांवर व सार्वत्रिक जागेवर न थुंकण्याची त्यांची सवय मनाला सुखावून गेली. महत्त्वाची बाब म्हणजे अमेरिकेत कुठलीही चांगली गोष्ट ही प्रत्येक व्यक्ती आपली राष्ट्रीय जबाबदारी समजतो. त्यामुळे श्रेय लाटणे वगैरे असा प्रकारच नसतो. कुठेही नेत्यांचे पोस्टर्स नाही की नेत्यांच्या जाहिराती नाही की सार्वत्रिक कामाचे राजकारण नाही. एवढे सुखविणारे वातावरण असूनसुद्धा मला अमेरिका निवासाच्या दृष्टीने का आवडली नाही? कारण श्री गजानन महाराजांच्या वाक्यांची वारंवार येणारी आठवण. आपल्याकडे आज डोनेशनरूपी राक्षसावर सरकारचेही निर्बंध नाहीत. अगदी नर्सरीसाठी दोन-अडीच लाख मोजावे लागतात, ही वस्तुस्थिती असल्यामुळे तरुण वर्ग अणि त्यातल्या त्यात आयटी क्षेत्रातील तरुणांचा कल अमेरिकेकडे यासाठी असतो की, इथे डॉलरमध्ये मिळणारा पगार आणि मुलांचे आठव्या वर्गापर्यंत होणारे नि:शुल्क शिक्षण.

इथली एककल्ली म्हणजे एकटेपणाची जाणीव करून देणारी जीवन पद्धती. संपूर्णपणे संपलेला सामाजिक संवाद. मुलांना आई-वडिलांच्या मायेपासून दूर नेणारी आणि आता हळूहळू भारतीयांमध्येही रुजत असलेली स्टेप मदर व स्टेप फादरची मन सुन्न करणारी पद्धती. पालकांची इच्छा नसताना आपली व त्यांची संस्कृती, जीवन पद्धती, एकसारखी नसतानाही त्यांच्या समोर होणारे अमेरिकी व भारतीय मुलामुलींचे आपसातील विवाह व त्यानंतर होणारे घटस्फोट, अमेरिकेत असूनही करीअरच्या गोंडस नावाखाली फक्त अधिक डॉलर कमवायला, वडिलांचे घरटे सोडून जगणारी व अमेरिकन संस्कृती खानपान अंगीकारणारी मुले, म्हणजे पर्यायाने शेवटी मुलांसोबत अमेरिकेत राहूनही एकटेच राहणारे आईवडील सर्वच भयानक वास्तव. त्यामुळे मन अस्वस्थ करणारी नीरव शांतता येथे जाणवते. गुड मॉर्निंग किंवा गुड नाईटशिवाय अमेरिकन तर सोडाच; आपले भारतीय वंशाचे नागरिकही मंदिरातील भक्तांचा अपवाद सोडला तर आपसात मिसळताना दिसत नाहीत. दुसरी बाब म्हणजे येथील खानपान सर्वसाधारण भारतीय लोकांना आवडेलच असे नाही. बाहेर प्रवासात इंडियन हॉटेल दिसले तर ठीक नाहीतर मैदायुक्त पदार्थ खावे लागतात. आपले सण साजरे करताना कोणीही कोणाकडे फारसे लक्ष देत नाही म्हणजे घरातील स्त्रीने सणानिमित्त नटूनथटून आपला आनंद आपणच साजरा करावा, असे वातावरण असते. आपला हिंदुस्थान हा देव-संतांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेला व चिरस्थायी संस्कृती लाभलेला महान देश आहे. आपल्या देशातील असंख्य स्थळांना धार्मिक व ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. त्यामुळे भारतात फिरताना आपण कुठेतरी देव-संत अथवा थोर पुरुषांच्या सान्निध्यात आपोआपच असतो. जर खरंच हिंदू संस्कृती जगायची असेल तर हिंदुस्थानइतके पवित्र वातावरण अन्य कोणत्या देशात मिळू शकेल, असे वाटत नाही. श्री गजानन महाराजांनी सांगितल्याप्रमाणे कर्म, भक्ती आणि योग मार्गापैकी कुठल्याही एका मार्गाचा अवलंब करून आपण साधा आहार व सत्कर्माच्या मार्गाने चांगले जीवन हिंदुस्थानात राहूनही जगू शकतो. आपल्याला आपल्या जीवनात आनंदाने जगता येईल, एवढा पैसा नक्कीच भारतात कमावता येतो. त्यासाठी आपल्या लोकांपासून, नातेवाईक व समाज व मित्र परिवारापासून दूर राहून अगदी म्हातारपणापर्यंत खूप पैसा कमावला तरी त्याचा आपल्याला काय फायदा? पैसा व परमेश्वर प्राप्ती यापैकी पुण्य संचय करून देणारी परमेश्वरप्राप्तीची कास धरणाऱ्या हिंदू समाजातील तरुणांनी अमेरिका बघायला जरूर जावे, पण तेथे स्थायिक होऊन स्वतःला, पैसा व जीवनाचा ऱ्हास होणाऱ्या पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये अडकवू नये, असे प्रामाणिकपणे वाटते. म्हणूनच भारतातील हिंदूंना श्री गजानन महाराज म्हणतात,

'अगणित करावे पुण्य तेव्हाच होते येथे जनन।
हिंदुस्थान सोडून कुठेही जाऊ नका॥'

७७६८०६२६६६

(लेखक श्री गजानन विजय ग्रंथ संगीत पारायणाचे निर्माता, संगीत दिग्दर्शक आहेत.)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# आंतरिक सुरक्षेकडे लक्ष देण्याची गरज

देशाच्या सीमांवर आपले लष्कर अगदी डोळ्यात तेल घालून शत्रूंच्या हालचालींवर लक्ष ठेवून असते. देशाबाहेरून होणारी घुसखोरी, दहशतवादी हल्ले यांना आपल्या तिन्ही दलांचे जवान चोख उत्तर देत असतात, हे नुकत्याच घडलेल्या पहेलगाम घटनेनंतर केलेल्या ऑपरेशन सिंदूरने स्पष्ट झाले आहे. पण, देशाच्या आंतरिक सुरक्षेकडेही त्याहीपेक्षा जास्त सजग राहून समाजकंटकांचे मनसुबे नेस्तनाबूत करण्याची आवश्यकता आहे.

अशी गरज आज व्यक्त करावीशी वाटली कारण, मागच्या आठवड्यात बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा, खामगाव आणि शेगाव या तालुक्याच्या ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिसांनी केलेल्या कारवाईत पाच ते सात जणांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्या घरांवर छापा टाकण्यात आला. या कारवाईत ६० तलवारी जप्त करण्यात आल्या. या तलवारी म्हणजे काही भाजी चिरण्याच्या चाकूसारख्या नव्हत्या. मोठ्या होत्या. तर नागपूर शहरात केलेल्या कारवाईत एक अग्निशस्त्र व जिवंत काडतुसे जप्त करून ते बाळगणाऱ्यास अटक करण्यात आली. यापूर्वी २० नोव्हेंबर २०२१ मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील टुनकी या छोट्याशा गावात झारखंडच्या दहशतवाद विरोधी पथकाने कारवाई करून तेथे शस्त्र निर्मिती करणाऱ्या व ते विकत घेणाऱ्यांना पकडले होते. त्यांचा नक्षलवाद्यांशी संबंध असल्याचे देखील झारखंड दशहतवाद विरोधी पथकाने नंतर स्पष्ट केले होते. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर आणि जळगाव जा. तालुक्याचा काही भाग सातपुडा पहाड आणि अंबाबरवा अभयारण्य असून त्याला लागूनच मध्य प्रदेशची सीमा आहे. या परिसरात शस्त्र तयार करणारे घनदाट जंगल आणि दोन राज्यांच्या सीमावर्ती भागाचा फायदा घेऊन शस्त्रनिर्मिती व विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांच्यावर कारवाई करणे हे महाराष्ट्र व मध्य प्रदेश पोलिसांसमोरील मोठे आव्हान आहे. तर, आता हे शस्त्र खरेदी-विक्री व विनापरवाना बाळगण्याचे लोण अगदी शेगाव, खामगाव, नांदुरा यासारख्या तालुक्याच्या ठिकाणी पोहचले आहे. नांदुरा येथे १४ तलवारी जप्त केल्यानंतर दोन दिवसांनीच स्थानिक गुन्हे शाखेने खामगाव येथे कारवाई केली होती. त्या कारवाईत ३० च्यावर तलवारी जप्त करण्यात आल्या होत्या. त्या तलवारी नांदुरा येथे पकडलेल्या व्यक्तीकडून आणल्याचे पोलिस चौकशीत स्पष्ट झाले. सध्या काही समाज विघातक घटकांकडून देशातील शांतता व कायदा सुव्यवस्था कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे यावरून दिसून येते. त्यातच बांगलादेशी घुसखोर देशातील अनेक छोट्या छोट्या शहरातून वास्तव्य करीत असल्याचे काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या शोध मोहिमेत स्पष्ट झाले आहे. तेव्हा, समाजाने देखील सजग राहिले पाहिजे. आपल्या परिसरात, मोहल्ल्यात भाजी विकण्यासाठी व इतर वस्तू विकण्यासाठी येणाऱ्या अनोळखी फेरीवाल्यांवर लक्ष ठेवून त्यांची चौकशी केली पाहिजे. त्याबाबत काही संशय असल्यास पोलिसांना त्याची माहिती दिली पाहिजे. तसेच, शेगावसारख्या शांतताप्रिय शहरात तलवारी आढळणे हे संभाव्य धोक्याची चाहूल म्हणावी लागेल. शेगाव हे देशातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. येथे देशभरातून लाखो भाविक येतात. अशा गर्दीच्या ठिकाणी समाजविघातक घटकांकडून काही अप्रिय घटना घडविण्याची योजना या मागे नाही ना? याची चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच, या कारवाईत अटक करण्यात आलेले हे २० ते ३० वयोगटातील आहेत. या वयात काहीतरी करून दाखविण्याची खुमखुमी असते. त्यातून त्यांच्या डोक्यात काही अप्रिय विचारांची पेरणी देखील केली जाऊ शकते. शहरात विविध वस्तू किंवा साहित्य विकण्यासाठी बाहेरगावहून येणाऱ्या फेरीवाल्यांना शहरात शिरण्यापूर्वी पोलिस ठाण्यात जाऊन त्यांची संपूर्ण माहिती द्यावी लागत होती. आंतरिक सुरक्षेबाबत केवळ पोलिसांवर सर्व भार सोपवून चालणार नाही. तर, नागरिकांनी देखील आपल्या परिसरात फिरणाऱ्या अनोळखी व्यक्तीची चौकशी करून पोलिसांना सहकार्य केले पाहिजे. तसेच, स्थानिक गुन्हे शाखा, सीआयडी व इतर गुप्तचर विभागांनी मागच्या आठवड्यात जप्त केलेला शस्त्रसाठा कोणत्या उद्देशाने करण्यात आला होता, याची चौकशी करून त्याच्या मुळाचा शोध लावून त्या मागे असणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. खामगाव शहराची काही वर्षांपूर्वी पोलिस दप्तरी अतिसंवेदनशील शहर म्हणून नोंद होती. जातीय दंगली व संचारबंदीचा फटका खामगावकरांनी अनुभवला आहे. त्या अनुभवातून शहाणे होऊन या शहराने आपल्या कपाळी लागलेला हा कलंक गेल्या काही वर्षात पुसून टाकला आहे. मात्र, शहरात सापडलेल्या तलवारींवरून पुन्हा खामगाव ये रे माझ्या मागल्या सारखे वागणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तेव्हा, पोलिसांनी आंतरिक सुरक्षेबाबत अधिक सजग राहून देशविघातक शक्तींना हुडकून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

# विघ्नहर्त्याच्या उत्सवात विघ्न!

**नागेश दाचेवार**

मराठा आरक्षणाचा मुद्दा घेऊन मनोज जरांगे दोन वर्षांपासून आंदोलने करत आहेत. आता त्यांनी पुन्हा एकदा मुंबईत आंदोलनाचा घाट घातला आहे. त्यासाठीची त्यांनी निवडलेली वेळ मात्र सर्वांनाच खटकत आहे. नव्हे त्यांच्या हेतूवर आता शंका उपस्थित केली जात आहे. कारण मराठा समाजाला या सरकारने यापूर्वी आरक्षण दिले असून, ते सध्या लागू आहे. त्याचा लाभ मराठा समाजाला मिळत आहे. समाज लाभ घेतदेखील आहे. त्यानंतरही पुन्हा आरक्षण देण्याच्या मागणीसाठी उपोषण आणि आंदोलनाचे हत्यार उपसण्याचे कारण कळेनासे झाले आहे. तरीदेखील आंदोलन करण्याचा अधिकार संविधानाने सर्वांना दिलेला असल्याने, तो जरांगे यांनादेखील आहे. मात्र, गणेशोत्सवात पोलिसांवर प्रचंड ताण असतो, उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आपले आंदोलन गणेशोत्सवानंतर करण्याची विनंती करण्यात आली होती. तरीदेखील जरांगेंनी याच काळात आंदोलनाचा अट्टहास धरला. मुंबई हे एक अतिसंवेदनशील शहर आहे. मोठी सुरक्षा व्यवस्था, मोठी पोलिस यंत्रणा असताना, येथे छोट्यामोठ्या घटना घडत असतात. अराजकता माजविणाऱ्या तत्त्वांची पहिली नजर ही मुंबईवर असते. नुकतेच बांगलादेशमार्गे काही पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतात प्रवेश केल्याची गोपनीय माहिती आहे. आता बिहारमध्ये तीन लोक शिरलेत. मात्र, तीनच दहशतवादी आले कशावरून? त्यापेक्षा जास्त आले नाहीत असे ठामपणे कसे सांगता येईल? महाराष्ट्रात काहींनी शिरकाव केला नसेल अशी शक्यता कशी नाकारता येईल? त्यासाठी पोलिस, सुरक्षा यंत्रणांना तत्पर राहावे लागणार आहे. आता अशा घुसखोर दहशतवाद्यांचा हेतू गणेशोत्सवात अनिष्ट घडवण्याचा असेल तर हा मुंबईकरांसाठी आणि महाराष्ट्रासाठी किती महागात पडेल?

मुंबईतील गणपती उत्सवाबद्दल वेगळे सांगण्याची गरज नाही. गणरायाच्या उत्सवात अख्खी मुंबई भक्तिरसात दंग झालेली असते. या उत्सवाला गालबोट लागू नये म्हणून हा सगळा बंदोबस्त असतो. राज्यभरातून, देश-विदेशातून येथील गणपती उत्सव पाहण्यासाठी लोक येत असतात. लालबागच्या राजाचे केवळ मुखदर्शन व्हावे यासाठी लाखोंची रांग लागते. देशाचे गृहमंत्री अमित शाह उत्सव काळात सुरुवातीचे दोन दिवस मुंबईत मुक्कामाला आहेत. अनेक केंद्रीय मंत्री, उद्योगपती, सेलिब्रिटी गणरायाच्या दर्शनासाठी येत असतात. यामुळे पोलिस यंत्रणेवर प्रचंड ताण असतोच. त्यात हजारो लोक रस्त्यावर उतरल्यामुळे, होणारी वाहतूक कोंडी आणि मुंबईकरांचे जनजीवन विस्कळीत होऊ नये म्हणून, पोलिसांचा कस लागणार आहे. अशात रस्त्यावर उतरलेल्यांपैकी कोण आंदोलक आणि कोण आंदोलकांमध्ये शिरलेले अराजक तत्त्व आहेत हे ओळखणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे. यापूर्वीच्या जरांगेंच्या दोन आंदोलनामध्ये दंगलसदृश परिस्थिती निर्माण झालीच होती. पोलिसांनी तत्परतेने ती हाताळली तो भाग वेगळा. बरं गणेशोत्सवादरम्यान दहा दिवसांच्या काळात मुंबईतील जनजीवन विस्कळीत होऊ नये म्हणून आझाद मैदानात आंदोलनाला परवानगी देता येणार नसल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने आधीच स्पष्ट केले होते. ऐन गणेशोत्सव काळात आंदोलन पुकारल्याने मुंबईत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीसह कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी उच्च न्यायालयाने जरांगे पाटलांना मुंबईऐवजी खारघर येथील जागेचा पर्याय दिला होता. उच्च न्यायालयानेदेखील आंदोलनाच्या अधिकारावर गदा आणली नाही. तर, जरांगे यांनी आंदोलनासाठी यंत्रणेकडे रीतसर परवानगी मागावी, ती दिली तर शांततेत मुंबईऐवजी नवी मुंबई, खारघरमध्ये आंदोलन करावे हेही स्पष्ट केले. हे सगळं जरांगेची बाजू मांडण्यासाठी त्यांच्या वतीने न्यायालयात कोणी नसतानाही त्यांच्या आंदोलनाच्या स्वातंत्र्याचे हनन न्यायालयाने होऊ दिलेले नाही. त्यासोबतच सरकारकडून जरांगेंना आंदोलन पुढे ढकलण्यासाठी अनेक वेळा विनंती करण्यात आली. गणपती उत्सव होऊ द्या, त्यानंतर आंदोलन करा, असा मुख्यमंत्र्यांचा निरोप घेऊन गेलेल्या ओएसडींना रिकाम्या हाताने परतावे लागले.

मुळात जरांगेंनी यापूर्वी २९ ऑगस्ट २०२३, २५ ऑक्टोबर २०२३, १० फेब्रुवारी २०२४, ८ जून २०२४, २० जुलै २०२४, १७ सप्टेंबर २०२४, २५ जानेवारी २०२५ रोजी शेवटचे आंदोलन केले. या आंदोलनामधले अंतर बघितल्यास दोन, चार महिन्यांचे आहे. त्यामुळे जर आंदोलन गणेशोत्सवात येत असेल तर ते पुढे ढकलले जाऊ शकले असते. मात्र, पावसापाण्याचे दिवस असल्याने आंदोलकांसाठी मशिदी उघड्या करून देण्याचा निर्णय जाहीर करणाऱ्या समाजाला खुश करण्यासाठी जरांगेंनी आंदोलनाचा कालावधी हाच निवडला असावा का?, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. गणेशोत्सव काळात मुंबईला, मुंबईकरांना आणि सुरक्षा यंत्रणेला वेठीस धरून मुंबईकरांना अधिक संकटात टाकण्याचे काम होऊ नये, ही अपेक्षा ठेवणे गैर नाही. आंदोलनाचा श्रीगणेशा उत्सवानंतर अधिक जोमानेही होऊ शकला असता. मात्र, याचे भान आणि संयम आंदोलकांनी ठेवले नाही याची खंत वाटते. गणेशोत्सव काळात मुंबईला मराठा आंदोलकांच्या अट्टहासाचे गालबोट लागू नये.

**१९ टक्के आणि ३५० जाती :** ओबीसींमध्ये ३५० जातींचा समावेश आहे. या सगळ्या जातींसाठी केवळ १९ टक्के आरक्षण दिलेले आहे. यात मराठा समाजाचा समावेश केल्यास मराठा समाजाच्या वाट्याला काय येईल, १० टक्के लाभ मिळाला असता का? आणि त्याचवेळी सरकारने दिलेल्या स्वतंत्र १० टक्क्यांच्या आरक्षणाचा पूर्ण लाभ समाजाला मिळत आहे. मग स्वंतत्र आरक्षण समाजाच्या हिताचे असेल तर, ओबीसीतच आरक्षण मिळावे यासाठी अट्टहास का चालला असावा? हे एक कोडंच आहे.

**समाजाने भान ठेवले पाहिजे :** मुळात मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी पहिल्यांदा १९८० साली माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांनी केली. मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसाठी १९८२ साली पहिला मोर्चा त्यांनी काढला होता. तेव्हापासून २०१४ पर्यंत शरद पवार (१९७८), बाबासाहेब भोसले (१९८२), वसंतदादा पाटील (१९८३), शिवाजीराव पाटील-निलंगेकर (१९८५), शंकरराव चव्हाण (१९७६ व १९८६), शरद पवार (१९८८ व १९९३) ४ वेळा मुख्यमंत्री राहिले, नारायण राणे (१९९९), विलासराव देशमुख (१९९९ व २००४), अशोक चव्हाण (२००८ ते २०१०) असे ९ मराठा मुख्यमंत्री प्रदीर्घ काळ राहिले. पण मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या विषयाला हात घातला तो देवेंद्र फडणवीस यांनी, ते कार्य पुढे नेले एकनाथ शिंदे या मराठा मुख्यमंत्र्याने. फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी पहिल्यांदा मराठा समाजाला आरक्षण दिले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ फडणवीसांनी कार्यान्वित केले. जे आघाडी सरकाच्या काळात बंद होते. सारथीसारखी संस्था त्यांनी सुरू केली. याचे भान, जाणीव मराठा समाजाने ठेवले पाहिजे.

९२७०३३३८८६

### तरुण भारतचे 'धर्म-अध्यात्म' सर्वांगसुंदर

तरुण भारतमधील प्रत्येक शुक्रवारी एक आध्यात्मिक भेट वाचकांना तृप्त करून जाते. धर्म आणि अध्यात्म हे एक पान जीवनाला दिशा देणारे आहे. प्रत्येक लेख अभ्यासपूर्ण आणि ज्ञानात भर घालणारे आहे. मनात भगवंतावर मनापासून श्रद्धा आणि विश्वास असेल तर प्रत्येक क्षण आनंदाचा होऊन जातो. जे काही योग्य असेल ते परमेश्वर निश्चित करतो हा मनात विश्वास असेल तर मन निश्चिंत होऊन जाते. प्रत्येक कार्यात सकारात्मकता येते. हातून सत्कर्म घडतात आणि त्यातूनच पुण्य संचय वाढत जातो. हे एक चक्र आहे आणि यातून चांगले तेच घडते. संयोजक शिल्पा कवठेकर यांचे विशेष आभार. 'कण कण वेचित बोटे' ऋषिपंचमीनिमित्त लेख भावला. 'अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे हे खरे आहे' हा महाराजांचा उपदेश आचरणात आणणे आवश्यक आहे. समर्थ वाणी पण उत्तम आहे. विद्या वाचस्पती स्वानंद पुंड यांचे सदर श्री गणेशाच्या महतीची उकल अतिशय सुरेख केली आहे. मानवी मन हे आध्यात्मिक वृत्तीकडे सहज वळते कारण प्रत्येक जीवात त्याचाच अंश आहे आणि म्हणूनच सण, उत्सव, परंपरा यांचे आनंदाने आणि जल्लोषात स्वागत केले जाते. आनंदाची देवाणघेवाण करणारी आपली भारतीय संस्कृती खरोखरच समृद्ध करणारी आहे. मानदंड संस्कृतीचे माहितीपूर्ण आहे.

ऋषी स्मरण अतिशय महत्त्वाचे आहे. ऋषींचे पूजन म्हणजे त्यांच्याप्रति श्रद्धा वाढवणारे आणि त्यांचा सन्मान करणारे हे व्रत आहे. ऋषी म्हणजे केवळ आध्यात्मिक मार्गदर्शन करणारे गुरू नसून जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मार्गदर्शन करणारे समाज सुधारक होते. त्यांनी आपल्या तप साधनेतून आपल्याला दिलेले ज्ञान जीवन समृद्ध करणारे आहे. वेद, उपनिषद्, ब्रह्मसूत्र हे सर्व म्हणजे जीवनाला दिशा देणारे आहेत. एकूणच माहितीपूर्ण लेखांचा हा खजिना आहे हे निश्चित. तरुण भारत समूह आणि लेखकांचे हार्दिक अभिनंदन!

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

●● ●●

### तरुणाईच भारताला विश्वारूढ करेल

आपला सनातन भारत हा उत्सवप्रिय लोकांचा देश आहे. उत्तरेतील पर्वत रांगा, दक्षिणेतील समुद्र, मध्य भारतात जंगले, भाषा, राहणीमान, खानपान भिन्न असले तरी संस्कृती एकच आहे. विभिन्न नामकरण असलेला परमेश्वर प्रत्येक आस्तिकाला प्रिय आहे. भारतीय माणूस ईश्वराचे नामस्मरण करताना संगीताच्या साक्षीने कीर्तन, भजन, पूजन, कथा वाचन, गायन आणि नृत्य करून अभिव्यक्त होत असतो. वाद्य त्याला साथ देत असतात.प रंपरेने सुरू असलेल्या उपासना आणि उत्सव सामूहिक पद्धतीने अत्यंत उत्साहाने व समर्पित भावाने प्रकट होत असतात. हेच सनातनचे बलस्थान आहे. असंख्य देवता, त्यांचे जन्मोत्सव, अवतरण, सद्गुरूंचे पुण्यस्मरण दिन साजरे करताना त्यास विशेष अनुभूती आणि आनंद प्राप्त होत असतो.

आपल्याकडील चातुर्मासात श्रीकृष्ण जन्मोत्सव, गणेशोत्सव आणि देवी नवरात्र हे साजरे होत असताना तरुणाईचा जोष वाखाणण्याजोगा असतो. त्या काळात त्यांचे रक्त सळसळत असते. हजारोंची गर्दी असली तरी भान हरपून समर्पण करणारी तरुणाई बघितली की आपलेही अल्प काळासाठी भान हरपते. सध्या समाज माध्यमातून या उत्साही तरुणांवर बरीच आगपाखड होत आहे. भिन्न धर्माच्या सणाच्या प्रदर्शन प्रकृतीची उदाहरणे देऊन यांच्या उत्साहात विरजण घालण्याचे काम होत आहे. सनातन धर्म हा एकमेव असा धर्म आहे की प्रत्येक उत्सव साजरा होत असताना त्यास धर्म, लिंग, जात, पंथ व वयाचे बंधन नाही. हीच आपली समरसता आहे. यातूनच हिंदू संघटित होत आहे. विदेशात पण या तरुणाईने ही संस्कृती जपली आहे. या वर्षी तब्बल ६५ हजार गणेश मूर्तींची विभिन्न देशांत निर्यात झाली हे वाचून हीच तरुणाई सनातन संस्कृतीला ऊर्जितावस्था आणणार आहे. येत्या काही वर्षांत भारत विश्वारूढ होण्यासाठी सर्व ज्येष्ठ मंडळींनी एकजुटीने या तरुणांना प्रोत्साहित करणे हीच काळाची गरज आहे.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

●● ●●

### पावसाळ्यात वाहणारे पाणी थांबविणे गरजेचे

दरवर्षी पावसाळ्यात कोट्यवधी लिटर पाणी वाहून जाते आणि नद्या-नाले भरून ओसंडून वाहतात. काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण होते, तर उन्हाळ्यात अनेक गावे पाण्याच्या टंचाईला तोंड देतात. या परिस्थितीत पावसाचे पाणी थांबवून ते साठवणे हीच खरी काळाची गरज झाली आहे. गावागावांतील तलाव, विहिरी, बंधारे यांची दुरुस्ती आणि पाणलोट क्षेत्राचा विकास आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग केले तर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साठवता येते. पाणी साठवल्याने जमिनीतील पाणी पातळी वाढते, शेतीसाठी उपलब्ध पाणी वाढते आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटतो. पावसाळ्यातील पाण्याच्या नियोजनाअभावी अनेक जिल्ह्यांना दुष्काळाची झळ बसते. पिके वाळतात,

जनावरांना पाणी मिळत नाही. प्रत्येक गावाने आपल्या परिसरात किमान काही जलसाठे उभारले पाहिजेत. शेतकऱ्यांनी शेततळे, कोठारे, बोअरवेल रिचार्जिंगसारखे उपाय अंगीकारले तर पाणीटंचाईवर मात करणे शक्य आहे. 'पावसाळ्यातील पाण्याचा थेंब साठवा, उन्हाळ्यातील तहान भागवा' हा संदेश आज प्रत्येक घराघरात पोहोचला पाहिजे. निसर्गाने पाहिजे तितके पाणी उपलब्ध केले आहे पण वाहते पाण्याचे संगोपन करणे गरजेचे झाले आहे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नामलगाव फाट्याजवळ भीषण अपघात; सहा जणांना कंटेनरने चिरडले





तभा वृत्तसेवा
बीड दि.३० ऑगस्ट

बीडमधून जाणाऱ्या धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी भीषण अपघात झाला. या अपघातात सहा जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पेंडगाव येथील मारुतीच्या दर्शनासाठी सहा जण निघाले होते. मात्र नामलगाव फाटा येथील उड्डाणपूलाजवळ भरधाव येणाऱ्या कंटेनरने या सहा जणांना उडवले. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा देखील दुर्दैवी मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, आकाश कोळसे, दिनेश पवार, विशाल काकडे, किशोर तावरे, अनिकेत शिंदे आणि पवन जगताप अशी मृतांची नावं आहेत. यातील सर्वजण पंचविशीच्या आतील आहेत. यातील काही तरुण पोलीस भरतीची तयारी करत होते. या अपघाताची माहिती कुटुंबीयांना मिळाल्यानंतर त्यांनी जिल्हा रुग्णालयात गर्दी केली होती. मृत झाल्याची माहिती मिळताच कुटुंबीयांनी एकच आक्रोश करत हंबरडा फोडला. दरम्यान या दुर्दैवी घटनेने परिसरात एकाच शोककळा पसरली आहे. धुळे सोलापूर महामार्गावर काही दिवसांपूर्वी गडी जवळ सहा तरुणांना भरधाव वाहनाने चिरडले होते. आता पुन्हा अशीच घटना घडली आहे. या महामार्गावर मोठ्या प्रमाणात ब्लॅक स्पॉट निर्माण झाल्याने प्रशासनाने उपाययोजना करणे गरजेचे आहे.





डॉ. हेडगेवार सार्वजनिक वाचनालयात डॉ. मुकुंद पैठणकर (भुल रोगतज्ञ) यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी वाचनालयाचे कार्यवाह नंदकिशोर झरीकर .संचालक शशिकांत पसारकर .डॉ. कृष्णा बारटक्के .इतिहास संकलनाचे कार्यवाह सुहास जोशी. अकाउंटंट महेश कुलकर्णी. सुनील रत्नपारखी. शंतनू घाडगे. शेरकर रमाकांत. सुरेश जाडे .श्रीपाद शेरकर. तसेच वाचक सभासद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# साबला ग्रामपंचायत व सर्व ग्रामस्थ यांच्या वतीने ओम नाईकनवरे यांचा सत्कार सोहळा संपन्न

तभा वृत्तसेवा
केज दि.३० ऑगस्ट

तालुक्यातील मौजे साबला येथील ओम अभिमान नाईकनवरे यांची जिल्हा परिषद बीड. आरोग्य सेवक म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा ग्रामपंचायत कार्यालय, साबला तसेच साबला नगरीतील सर्व ग्रामस्थांच्या वतीने ओम अभिमान नाईकनवरे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जनाबाई नरहरी काकडे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे, माजी सरपंच मधुकरराव काकडे, माननीय लहूराव राऊत – महिला व बालविकास संरक्षण अधिकारी, श्रीमती चंद्रभागा अभिमान नाईकनवरे – अंगणवाडी सुपरवायझर यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील कार्याला शुभेच्छा देण्यात आल्या.

सत्कार समारंभ प्रसंगी ओम नाईकनवरे यांनी आपल्या मनोगतातून प्रथम सर्व उपस्थितांचे आभार मानले. आणि या माझ्या यशात प्रथम माझे आईवडील, तसेच माझी मोठी बहिण चंद्रभागा राऊत व मेहुणे लहूराव राऊत तसेच माझे सर्व कुटुंबीय सुध्दा आहेत. सत्कार प्रसंगी भावुक होऊन ओम नाईकनवरे यांनी असे म्हटले. की पुढील सेवेच्या कार्यकालात सर्वांची सेवा ही माझ्या कुटुंबातील सदस्य आहेत . असं समजून त्यांची सेवा करण्याची अशी ग्वाही त्यांनी दिली .



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच जनाबाई काकडे यांनी असे म्हटले की ओम नाईकनवरे यांची परिस्थिती ही सर्वसाधारण कुटुंबातील असून आई आणि वडिल हे शेतात काबाड कष्ट करतात. शेतीही जास्त नाही शेतीतील उत्पन्न ही पावसावर अवलंबून आहे. मग आपण अभ्यास नाही केला तर आपले काय होईल . याचा विचार करून ओम नाईकनवरे यांनी चांगले यश मिळविले याबद्दल सरपंच जनाबाई काकडे यांनी ओम नाईकनवरे यांचे अभिनंदन केले. व पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या.

माजी सरपंच मधुकरराव काकडे, उमाशंकरराव शिंदे – माजी पोलिस उपनिरीक्षक, आदर्श शिक्षक विक्रमराव नाकईनवरे, लहूराव राऊत, चंद्रभागा राऊत यांनीही ओम नाईकनवरे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमासाठी साबला नगरीतील सर्व लहान थोर वडिल धारी मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक सुधीर नाईकनवरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन माजी उपसरपंच अभिमान नाईकनवरे यांनी मानले.

# शुद्ध अंतकरणाने भगवंताला शरण जा–ह.भ.प माधव महाराज शास्त्री

## बापूराव दादा साळुंके यांचा २२ वा पुण्यतिथी उत्सव साजरा



तभा वृत्तसेवा
केज दि.३० ऑगस्ट

आपणास मिळालेला नरदेह अत्यंत मोलाच आहे भगवंतांनी आपणास हा मानव देह दिला हे आपल भाग्य आहे ,देवाचे आपणावर अत्यंत उपकार आहेत .आपण शुद्ध अंतकरणाने भगवंताला शरण जा यामध्ये आपले हीत आहे असे अनमोल विचार माधव महाराज आगे यांनी काल दिनांक २७ /८/२०२५ रोजी श्री गणेश चतुर्थी बुधवारी बापूराव दादा साळुंके यांच्या २२ व्या पुण्यतिथी उत्सवात कीर्तन रुपी सेवेमध्ये आपले विचार विशद केले.

कवडगाव येथील किर्तन सेवेसाठी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा

श्रश्र म्हनऊनी शरण जावे
सर्व भावे देवासी श्रश्र १श्रश्र
श्र तो हा उतरील पार श्र
श्र भवदुसतर नदीचा श्रश्र २ श्रश्र
बहु आहे करुणावंत श्र
अनंत हे नाम ज्या श्रश्र ३ श्रश्र
तुका म्हणे साक्षी आले श्र
तरी केले प्रगट श्रश्र ४ श्रश्र

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले .आपणावर भगवंताचे अनंत उपकार आहेत. उपकार करणाऱ्यांचे आभार माना ,त्यांच्याविषयी नेहमी आदर भाव ठेवा, प्रेम भाव ठेवा,

भगवंतांनी आपल्याला मानव जन्म देऊन आपणावर मोठे उपकार केले आहे .याचा विसर पडू देऊ नका असे म्हटले. ईश्वर हा सर्वांना आपल्यामध्ये सामावून घेतो उपकार करणाऱ्यांनाही सायूजता मुक्ती प्राप्त करून देतो हे सांगताना महाराजांनी पुतना मावशीचे उदाहरण देऊन भगवंत किती मोठ्या अंतकरणाचा आहे हे सांगितले. बापूराव दादा साळुंके यांनी

आपले संपूर्ण जीवन परमार्थासाठी खर्च केले त्यांनी केलेल संस्कार व परमार्थिक कार्य आज त्यांचे कुटुंब मोठ्या भक्ती भावाने २२ वी पुण्यतिथी साजरी करत आहे यावरून त्यांचा परमार्थ सफल झाला असे म्हटले,

आणि संपूर्ण साळुंके कुटुंबाला धन्यवाद दिले

पुण्यस्मरण त्यांचेच होते ज्यानी आपले आयुष्य परमार्थासाठी व जगाच्या कल्याणासाठी खर्च केलं अशा महात्म्याचे पुण्यस्मरण व पुण्यतिथी उत्सव साजरे होतात . बापूराव दादांची आज २२ वी पुण्यतिथी साजरी करताना आम्हालाही खूप आनंद होत आहे असे महाराजांनी म्हटले .



या कार्यक्रमाला गायन साथ बजरंग महाराज चव्हाण व काळे महाराज पोखरीकर यांची सुंदर मिळाली. या पुण्यतिथी उत्सवाला कवडगाव ,मोरेवाडी, गावठाण ,परळी ,बीड ,पुणे, वडवणी तसेच पंचक्रोशीतील भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

किर्तन सेवेनंतर सर्वांनी महाप्रसाद लाभ घेतला .

भजन संध्या

बापूराव दादा साळुंके यांच्या २२व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त दिनांक २६/८/ मंगळवारी रोजी रात्री संगीत भजनाचे आयोजन करण्यात आले होते .या संगीत भजनामध्ये मोरेवाडी , बोलेगाव, कवडगाव,गावठाण बीड येथून गायक वादक मंडळी हजर होते. रात्री दोन वाजेपर्यंत या संगीत भजनाचा सर्वांनी आनंद घेतला

या भजन संध्यामध्ये सुमधुर अभंग व सुरेल गवळणी यांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला

# अनावरण सोहळ्यास हजारोच्या संख्येने उपस्थीत रहावे– डॉ.रणजीत कसबे

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.३० ऑगस्ट

तालुक्यातील मौजे कल्याण नगर येथे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त दि. ३१ ऑगस्ट २०२५ वार रविवार रोजी सकाळी ११: ०० वाजता साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती व अध्यक्रांती गुरु लहुजी साळवे यांच्या अर्धाकृती पुतळ्याचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर नाना शिंदे हे व या मूर्तीचे लोकार्पण छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील प्रमुख राजकीय व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार असून तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी शेकडोच्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे व कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आव्हान या कार्यक्रमाचे आयोजक डॉ.रणजीत कसबे व स्वागताध्यक्ष बप्पा कसबे मच्छिंद्र कसबे, दीपक कसबे, अमोल हिवाळे, सुनील कसबे, त्रिंबक कसबे, विकास कसबे यांनी केले आहे.

# मुंबई मराठा आरक्षण आंदोलनात पहिला बळी

## केज तालुक्यातील वरपगावचे सुपुत्र सतीश ज्ञानोबा देशमुख यांचे बलिदान!

तभा वृत्तसेवा
केज दि.३० ऑगस्ट



२९ऑगस्ट च्या मुंबई मराठा आरक्षणाचा पहिला बळी बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील वरपगावचे सुपुत्र सतीश ज्ञानोबा देशमुख यांच्या रूपाने गेला आहे.

'मराठा समाजाला आरक्षण मिळावे' यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत २९ऑगस्ट मुंबईत होणाऱ्या आमरण ऊपोषणासाठी गेलेल्या लाखो मराठा समाज बांधवासोबत सतीश देशमुख सहभागी झाले होते. बुधवारी सकाळी ते गावातील कांहीं सहकाऱ्यांसोबत मुंबईच्या दिशेने निघालेल्या रॅलीत सहभागी झाले होते. बुधवारी रात्री जुन्नर येथे मुक्काम झाल्यानंतर गुरुवारी सकाळी १० वाजता ते आपल्या सहकाऱ्यासोबत आंघोळ नाष्टा आटोपून रॅलीत नारायणगाव मार्गे मुंबईच्या दिशेने निघाले होते. गाडीत बसून दहा मिनिटे प्रवास करताच त्यांचा वाटेत 'हार्ट अटॅक' ने मृत्यू झाला. सतीश देशमुख अत्यंत शांत,जिद्दी व प्रामाणिक स्वभावाचे होते. सतीश देशमुख यांच्या परिवाराला देशसेवेचा वारसा लाभलेला आहे. त्यांचे वडील ज्ञानोबा एकनाथराव देशमुख व लहान भाऊ व्यंकटेश ज्ञानोबा देशमुख हे भारतीय सैन्यदलात सेवारत होते. सध्याच्या मुंबई आंदोलनात भाऊ व्यंकटेश ज्ञानोबा देशमुख यांनी पुणे व बीड जिल्ह्यात गावोगावी फिरून मराठा बांधवांमध्ये आरक्षणाचे महत्व पटवून मोठी जनजागृती केली होती. यावेळी आपल्या मोठ्या भावाचे प्राण गमवावा लागतील याची कल्पनाही केली नसेल.या कुटुंबावर दोन वर्षात हा दुसरा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दोन वर्षापूर्वीच सतीश देशमुख यांच्या स्वप्नील नावाच्या मोठ्या मुलाचा विजेचा करंट लागून मृत्यू झाला होता. बेरोजगार असणारा स्वप्नील इतरांच्या ट्रॅक्टर वर काम करून कुटुंबाचा आधार बनू पाहत होता. ट्रॅक्टर वर काम करत असतानाच त्याचा मृत्यू झाला. सध्या सतीश देशमुख आपला दुसरा मुलगा शिवप्रसाद याला बारावी नंतरच्या पॉलिटेक्निक अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्याच्या विवंचनेत होते. कुटुंबाची परिस्थिती हलाखीची असल्याने व पॉलिटेक्निकच्या प्रवेशाचे मोठे शुल्क आवाक्याबाहेर असल्याने शिवप्रसादच्या पॉलिटेक्निक प्रवेशासाठी ते चिंतीत होते. मराठा आरक्षणामुळे तरी आपल्या मुलाला शिक्षणात सूट मिळेल या आशेने ते या मुंबई मराठा आरक्षणात सहभागी झाले होते. हे दुःखद वृत्त कळताच संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मृत सतीश देशमुख यांचे लहान बंधू मराठा सेवक व्यंकटेश देशमुख यांना जवळ बोलावून त्यांचे सांत्वन केले व देशमुख कुटुंबाप्रती आपल्या संवेदना व्यक्त केल्या. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले.सतीश देशमुख यांच्या मागे आई, पत्नी संध्या, मुलगा शिवशंकर व लहान बंधू व्यंकटेश यांचा परिवार आहे.

# पावसाळ्यात कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा हिवताप कार्यालयाकडून अबेटिंग मोहीम

तभा वृत्तसेवा
बीड दि.३० ऑगस्ट

वाढत्या किटकजन्य आजारांमुळे जिल्हा हिवताप कार्यालयाने बीड शहरात एक धडक मोहीम राबविली आहे. या मोहिमेचे मार्गदर्शन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ आणि जिल्हा हिवताप अधिकारी श्री. विजयसिंह शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.

सध्या पावसाळ्याच्या दिवसांमध्ये बीड शहरात पाणी साठवणार्या जागांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे, यामुळे डासांच्या आळ्यांचे प्रमाण वाढले आहे. तसेच पाणी साठवणारे हौद, माठ, सिमेंटची टाकी व इतर प्रकारच्या पाण्याच्या साठ्यांमध्ये डासांची लारवा पिकून किटकजन्य आजारांसाठी पोषक वातावरण तयार होत आहे.

यामुळे, नागरिकांनी डेंग्यू, चिकनगुनिया, हिवताप आणि इतर किटकजन्य आजारांच्या प्रादुर्भावापासून बचाव करण्यासाठी सक्रियपणे योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मोहिमेचा भाग म्हणून बीड शहरात विविध भागांमध्ये अबेटिंग आणि गप्पी मासे सोडण्याची कार्यवाही सुरू आहे. जिल्हा हिवताप कार्यालयाच्या टीमने प्रत्येक घरांमध्ये आरोग्य शिक्षण देऊन, पाणी साठवणार्या ठिकाणी गप्पी मासे सोडण्याची सूचना केली आहे. तसेच, आठवड्यातून एक दिवस त्या साठ्यांना स्वच्छ करण्यासाठी सुचवले आहे.



आज इंदिरानगर भागामध्ये अबेटिंग कार्यवाही करण्यात आली, जिथे गप्पी मासे सोडण्याची प्रक्रिया राबवली गेली.

त्याचप्रमाणे, नागरिकांनी कीटकजन्य आजारांपासून बचावासाठी मच्छरदाणी, कॉईल्स आणि लिक्विड मच्छरदाणीचा वापर करून घरांमध्ये धूर करावा, असेही सांगितले गेले आहे.

या मोहिमेत जिल्हा पर्यवेक्षक संजय धस, आरोग्य सहाय्यक पवळ वाय.जे., पवळ एन.एस., सगरे एस.डी., जोगदंड करण, पठाण एस.आर., भिलारे पी.एन., जाधव व्ही.डी., करपे सी.एस., घाडगे एस.आर., वाघ अमित, मखले पी.के. यांचा सहभाग आहे.नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभागी होऊन आपल्या परिसरात किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी काळजी घ्यावी, असे आवाहन संबंधित अधिकार्यांनी केले आहे.

# जिल्ह्यात ३१३ गावांमध्ये एक गाव एक गणपती उपक्रम यशस्वी

## पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या समाजप्रबोधनाला यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**

पोलिस विभागाच्यावतीने एक गाव एक गणपती यासंदर्भात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली शांतता समितीच्या बैठका आयोजित करून समाज प्रबोधक करण्यात आले. या अभियानाला यश मिळाले असून जिल्ह्यातील ७१० गावांपैकी ३१३ गावांमध्ये एक गाव एक गणपती उपक्रम राबविण्यात आला आहे. यामुळे सामाजिक एकोपा आणि पोलिसांवरील ताणही कमी होण्यास मदत मिळणार आहे.

गणेशोत्सवापूर्वी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना तसेच गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे, आंबादास भुसारे तसेच सर्व पोलिस ठाण्यांचे प्रभारी यांच्या उपस्थितीमध्ये शांतता समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी डीजे ऐवजी पारंपारीक वाद्यांना प्राधान्य देणे, सामाजिक एकोपा राखण्यासाठी एक गाव एक गणपती बसविण्यात यावा असे आवाहन या बैठकांमधून करण्यात आले. या बैठकांमुळे जिल्ह्यातील ७१० गावांपैकी ३१३ गावांनी पुढाकार घेत एक गाव एक गणपती हा उपक्रम त्यांच्या गावात राबविला आहे. एकच गणेशमूर्ती स्थापना करण्यात आल्यामुळे एकात्मतेचा संदेश तसेच समाज प्रबोधनाचे कार्यक्रम राबवले जाणार आहेत. गावात शांतता राखण्यात मदत होणार आहे. याशिवाय पोलिस बंदोबस्ताचा ताणही थोडासा हलका होणार आहे.

हिंगोली जिल्ह्यात औंढा पोलिस ठाण्यांतर्गत ६७, कळमनुरी पोलिस ठाण्यांतर्गत ३७, सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत २०, आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत ४०, हट्टा पोलिस ठाण्यांतर्गत ५, कुरूंदा पोलिस ठाण्यांतर्गत १९, हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत ३४, गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत १८, नर्सी पोलिस ठाण्यांतर्गत १०, बासंबा पोलिस ठाण्यांतर्गत ४० तर वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत २३ गावांमधून एक गाव एक गणपती संकल्पना राबविण्यात आली आहे.

# पानकन्हेगाव जि. प. शाळेत स्टुडंट पोलिस कॅडेट कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**

सेनगाव तालुक्यातील पानकन्हेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत दामिनी पथक व सेनगाव पोलिस दलाच्यावतीने स्टुडंट पोलिस कॅडेट अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे मार्गदर्शन मान्यवरांच्यावतीने देण्यात आले.

या कार्यक्रमास सेनगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी दामिनी पथकातील आरती साळवे तसेच शाळ-ेचे मुख्याध्यापक, शिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी दामिनी पथकाच्या आरती साळवे यांनी इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. दामिनी पथकाची सर्व माहीती देत पोलिसांची कार्यपध्दती तसेच स्टुंडट पोलिस कॅडेटबद्दल माहीती दिली. विद्यार्थीनींना संकटकाळी संपर्क साधण्यासाठी दामिनी पथकाचा संपर्क क्रमांक देण्यात आला. विद्यार्थीनींनी अनोळखी व्यक्तीपासून कसे सावध रहायचे तसेच स्वत:चे आत्मरक्षण कसे करायचे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

सध्या अल्पवयीन मुले मुली भरधाव वेगाने वाहन चालवित आहेत. त्यामुळे अपघातही होत आ-हेत. त्यामुळे अठरा वर्षाखालील मुलामुलींनी वाहन चालवू नये तसेच पालकांनीही आपल्या पाल्यांना वाहन चालविण्यास परवानगी देऊ नये. असे केल्यास पालकांविरूध्दही कारवाई होऊ शकते आदीबाबत सुरक्षेच्या दृष्टकोनातून मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त निर्माण व्हावी तसेच विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकस होण्यासाठी कवायतीचे महत्वही यावेळी मान्यवरांनी पटवून दिले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यशाळेत सहभाग घेतला.

# वसमत तहसीलमध्ये नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३० ऑगस्ट**

तहसील कार्यालयात आज तहसीलदार सौ. शारदा दळवी यांच्या अध्यक्षतेखाली नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन समितीची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान, पंचनामे प्रक्रिया आणि पुढील उपाययोजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.



तहसीलदार दळवी यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश देताना सांगितले की प्रत्येक गावामध्ये झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे तात्काळ, पारदर्शक व योग्य पद्धतीने करावेत. शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि कुठलाही शेतकरी वंचित राहू नये याची विशेष काळजी घ्यावी.आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत वेळेत मिळावी यासाठी महसूल व कृषी विभागाने संयुक्तरीत्या काम करावे.

या बैठकीस महसूल विभागातील अधिकारी, कृषी विभागाचे कर्मचारी, तालुका प्रशासना-चे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित हो-ते. बैठकीत आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा एकत्रितपणे काम करेल, असा निर्धार व्यक्त करण्यात आला. तहसीलदारांनी सर्व विभागांना कडक शब्दात सूचना दिल्या की कोणत्याही प्रकारचा विलंब किंवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. या निर्णयामुळे वसमत तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, पुढील काळात होणाऱ्या आ-पत्ती व्यवस्थापनासाठी प्रशासन सज्ज असल्याचे स्पष्ट झाले आहे.



**हिंगोली- महालक्ष्मी सणानिमित्त येथील गांधी चौकात आकर्षक महालक्ष्मीचे मुखवटे तसेच विविध प्रकारचे टोप आणि साहीत्याने बाजारपेठ सजल्या आहेत. विविध प्रकारची खेळणी देखील आली आहे. महिला मोठ्या संख्येने खरेदी करण्यासाठी दुकानांमध्ये गर्दी करीत आहेत.**

## संक्षिप्त वृत्त

### दीनदयाळ स्पर्श फिलोटेली शिष्यवृतीसाठी १० सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

हिंगोली- परभणी डाक विभागातर्फे दीनदयाळ स्पर्श फिलाटेली शिष्यवृत्ती योजना स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी आता १० सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहेत. परभणी डाक विभागांतर्गत येणाऱ्या परभणी, हिंग-ोली आणि जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन डाक अधीक्षक सतीश पाठक यांनी केले आहे. गेल्या २ वर्षांमध्ये परभणी डाक विभागामध्ये ११ विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती पटकावलेली आहे. यावर्षीही दीनदयाळ स्पर्श फिलाटेली शिष्यवृत्ती योजना २०२५-२६ स्पर्धा परीक्षेमध्ये सर्व शाळांनी सहभाग नोंदवून आपल्या शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना भारतीय डाक विभागाची शिष्यवृत्ती पटकावण्याची संधी द्यावी, असे आवाहन डाक अधीक्षक सतीश पाठक यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सहायक डाक अधीक्षक (मुख्यालय) पवन मोरे, कार्यालयीन सहायक श्रीपाद कुंभारकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन परभणी डाक विभागामार्फत करण्यात आले आहे.

### सोडेगाव शिवारात तिसऱ्यांदा अतिवृष्टी

हिंगोली- कळमनुरी तालुक्यातील सोडेगाव शिवारात २९ ऑगस्ट रोजी सकाळी पाच वाजता पुन्हा एकदा तिसऱ्यांदा अतिवृष्टी झाली. सलग अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी हतबल झाले आहेत. मात्र अद्याप कोणत्याही प्रकारचे पंचनामे झालेले नाहीत. यापूर्वीही झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन, कापूस, तूर ,हळद, मोसंबी, केळी आदी पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. सततच्या पावसामुळे शिवारात पाणी साचून आहे आणि पिके उभी मरत चालली आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ, शिवग्राम विकास संघटन तसेच ग्रामपंचायत सोडेगाव यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामा करण्याचे वारंवार निवेदन दिले आहे. शेतकऱ्यांना योग्य भरपाई व मदत मिळावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी आवाज उठवला आहे. मागील दोन वेळा झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्या संदर्भात ग्रामस्थांनी प्रशासनाचे लक्ष वेधले असले तरी अद्याप कोणत्याही प्रकारचे पंचनामे झालेले नाहीत. त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये प्रचंड नाराजी व असंतोष दिसून येत आहे. शासन व प्रशासनाने तातडीने सोडेगाव शिवारात पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. ग्रामीण जनतेची अपेक्षा आहे की प्रशासनाने तातडीने पाहणी करून पंचनामा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

### दसरा महोत्सव समितीची मंगळवारी बैठक

हिंगोली- येथील ऐतिहासिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने दसरा महोत्सवाची तयारी करण्यात आली असून या निमित्त सर्व प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या प्रतिनिधींचे दि २ सप्टेंबर रोजी मंगळवारी उपविभागीय अधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांची उपस्थिती असणार आहे.

# श्रीगणेशा आरोग्य उपक्रम आरोग्य शिबीरे घेवून यशस्वी करा- बोधवड

## नागरिकांची होणार आरोग्य तपासणी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने 'श्रीगणेशा आरोग्याचा' हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. हे अभियान जिल्ह्यात जास्तीत जास्त आरोग्य शिबिरे घेऊन यशस्वी करावा, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी आयोजित बैठकीत दिल्या.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य शिबिराच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत हो-ते. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.चक्रधर मुंगल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी डॉ. प्रकाश जाधव, डॉ. बालाजी भाकरे, डॉ.मोहसीन खान, मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.नामदेव कोरडे, गणेश मंडळाचे प्रतिनिधी कल्याणराव देशमुख, सचिन इंगळे, नागेश संगेकर, संतोष शेंडगे आदी उप-स्थित होते.



सार्वजनिक गणेश मंडळाचे सहकार्य घेऊन जिल्ह्यात दि. २७ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत जास्तीत जास्त आरोग्य शिबिराचे आयोजन करावे. या शिबिरामध्ये विविध तप-ासणीसह मुख्यमंत्री सहायता निधी व शासन आरोग्यविषयी राबवित असलेल्या विविध योज-नेची जनजागृती करावी, अशा सूचना यावेळी श्री. बोधवड यांनी दिल्या.

यावेळी माहिती देताना डॉ. कोरडे म्हणाले, मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण म हाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला असून महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र तसेच धर्मादाय रुग्णालयांशी यांच्या सहकार्याने जिल्ह्यात जवळपास २०० आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहेत. या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आ-हेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे. तसेच या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार आहे. 'श्री गणेशा आरोग्याचा' या उपक्रमातून हज-ारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तप-ासणी करण्याची संधी मिळत असून, या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन येथील मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धम र्दाय रूग्णालय मदत कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नामदेव कोरडे यांनी केले आहे.

# आदर्श महाविद्यालयात रेड रिबन क्लबचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**

येथील आदर्श म हाविद्यालयामध्ये रेड रिबन क्लब चे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघ-ाव व शासकीय सामान्य रुग्णालयाचे बालाजी चाफाकानडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी एच आय व्ही एड्स बद्दल बालाजीचाफा कानडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या व्हायरसमुळे मनुष्याची प्रतिकारशक्ती कमी होऊन मनुष्याचे शरीर हे अनेक आजारा-चे माहेरघर बनते असे त्यांनी सांगितले. या आजारावर अद्याप पर्यंत कोणतीही लस उप-लब्ध नसल्याने जानकारी व जनजागृती करून आपण या आजारापासून स्वतःचा तसेच कुटुंबाचा यासोबतच समाजाचाही बचाव करू शकतो.



यावेळी प्रो. डॉ. बाळासाहेब साळवे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले एचआयव्ही व एड्स यामधील फरक समजून सांगितला माकडांपासून मनुष्य प्राण्यांमध्ये संक्रमित झालेल्या या रोगाने आतापर्यंत अनेक मानवांचा जीव घेतला आहे. त्यामुळे संक्रमित रक्त तसेच संक्रमित रक्तासोबत चा संबंध यापासून बचाव करूनच या आजारापासून वाचता येते. जास्त लोकांपर्यंत हा संदेश पोहोचवून आपण या आजारापासून दूर राहू शकतो असे त्यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते तर श्रीमती चोपडे या मंचावर उपस्थित होत्या. याप्रसंगी रेड रिबन क्लब चे उद्घाटन करण्यात आले. ज्ञानेश्वर मुडे हे अध्यक्ष तर अश्विनी घेणेकर यांची सचिव पदी नियुक्ती करण्यात आली. या कार्यक्रमासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. सचिन हाटकर, डॉ. तुकाराम हापगुंडे, प्रा. सुरेश वऱ्हाड शुभम सपाटे, ऐसान शेख, शैलेश कांबळे,अनिल डोंगरे, रोहन शेळके, अतिश टापरे, सुमेध धवसे, कु. रोमाईसा सईद, कु. वैष्णवी खेत्रे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी घेणेकर यांनी तर आभार कु. वैष्णवी खेत्रे हिने व्यक्त केले.

# ऑल इंडिया बंजारा सेवा संघाची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ३० ऑगस्ट**

येथील शासकीय विश्रामगृहात ऑल इंडिया बंजारा सेवा संघाची बैठक दि ३० ऑगस्ट रोजी पार पडली. यावेळी प्रदेशाध्यक्षपदी बापूराव राठोड यांची निवड करण्यात आली.

या बैठकीत बंजारा समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय तसेच समाजावर होणाऱ्या अन्यायाबाबत चर्चा करण्यात आली. बंजारा समाजाला आदिवासीमध्ये प्रवर्गात सामावून घ्यावे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी भाग-ोराव राठोड, उत्तम राठोड, ॲड पंजाब चव्हाण, सी के पवार, उल्हास राठोड, उत्तम पवार, गोवर्धन राठोड, अशोक चव्हाण यांच्यासह बंजारा बांधवांची उप-स्थिती होती.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गणेशोत्सवानिमित्त प्रा. चिंचखेडकर यांनी साकारली गणिताची प्रयोगशाळा व नामगिरी देवीचा देखावा

## विजयादशमीपर्यंत चालणारी प्रदर्शने विनामूल्य व सर्वांसाठी खुली

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

गणेशोत्सव म्हटले की भव्य सजावट, देखावे आणि सांस्कृतिक उपक्रम अपेक्षित असतात. मात्र, प्रा. श्रीकांत चिंचखेडकर गेल्या २१ वर्षापासून अखंडपणे देखाव्याच्या माध्यमातून टाकाऊ वस्तु आणि पर्यावरणपूरक साहित्यापासून निर्जीव देखावे सादर करण्याची परंपरा जपत आले आहेत. यंदा प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी गणित व संस्कृतीचा अद्भुत मेळ साधत गणित प्रयोगशाळा उभारली असून, त्यासोबतच तामिळनाडूतील सुप्रसिद्ध नामगिरी देवीचा देखावाही प्रेक्षकांचे डोळे दिपवणारा ठरत आहे. ही प्रदर्शनी विजयादशमीपर्यंत दररोज सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुली आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवणारे प्रा. चिंचखेडकर दरवर्षी गणेशोत्सवात हरी ओमनगरमधील निवासस्थानी गणेशोत्सव ते विजयादशमीपर्यंत प्रदर्शनी लावतात. यंदा गणितातील गूढ संकल्पना जनमानसात पोहोचवण्यासाठी एका आगळ्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून ते नवा प्रयोग घेऊन आले आहेत. या प्रयोगशाळेत जवळपास १०० हून अधिक वर्किंग मॉडेल्स साकारले असून, गणितातील मूलभूत संकल्पना, सूत्रे आणि समीकरणे अगदी सोप्या, रंजक व गमतीशीर पद्धतीने



सादर करण्यात आली आहेत. या प्रयोगशाळेतील विशेष आकर्षण म्हणजे जगप्रसिद्ध गणितज्ञांचे भव्य मूर्तीरूप चरित्र. यात श्रीनिवास रामानुजन, आर्किमिडीज, महावीराचार्य, नेपियर, स्वामी भारती कृष्ण तीर्थ, पायथागोरस, भास्कराचार्य (द्वितीय), कार्ल गॉस, अपोलोनियस, युक्लिड, श्रीधराचार्य, बोधायन, प्रशांत चंद्र महालनोबिस यांसारख्या भारतीय व परदेशी दिग्गज गणितज्ञांचे कार्य प्रभावीपणे उभे करण्यात आले आहे. गणिताची भीती विद्यार्थ्यांच्या मनातून घालवून त्यांच्या मनात या विषयाविषयी आकर्षण निर्माण करणे हा या प्रदर्शनामागील मुख्य उद्देश आहे. त्याचबरोबर महान गणितज्ञांच्या कार्याचा गौरव करून त्यांची प्रेरणादायी माहिती प्रत्येकापर्यंत पोहोचवणे हेही ध्येय प्रा. चिंचखेडकर यांनी ठेवले आहे. विशेष म्हणजे, रामानुजन यांना स्वप्नातून गणितीय सूत्रे सुचवणारी तामिळनाडूतील नामगिरी देवीचा देखावाही या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरत आहे. गणिताचा वैज्ञानिक गाभा आणि अध्यात्मिकतेचा संगम यातून अधोरेखित होत असल्याचे प्रेक्षकांना अनुभवास येत आहे. गेल्या वर्षी त्यांनी विज्ञान प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण केली होती, तर यंदा गणिताचे अप्रतिम विश्व उलगडून दाखवले आहे. गणितप्रेमी, विद्यार्थी व पालकांनी अवश्य भेट द्यावी, असे आवाहन प्रा. चिंचखेडकर यांनी केले आहे.

### नामगिरीदेवी ही गणित आणि अध्यात्माचा सेतू

गणित हा विषय बहुतेक विद्यार्थ्यांना भीतीदायक वाटतो. पण गणित हे प्रत्यक्षात आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. गणेशोत्सवासारख्या उत्सवाच्या निमित्ताने जर आपण मुलांसमोर गणित अगदी सोप्या, रंजक व प्रात्यक्षिक स्वरूपात मांडले, तर त्यांची दृष्टी बदलू शकते, हा माझा विश्वास आहे. याच उद्देशाने गणित प्रयोगशाळा साकारली. या प्रयोगशाळेतून विद्यार्थ्यांना गणितातली गंमत आणि उपयुक्तता दोन्ही समजावून सांगायची आहे. रामानुजन यांना स्वप्नातून सूत्रे सुचवणारी नामगिरी देवी ही गणित आणि अध्यात्म यांचा सेतू आहे. हा देखावा साकारताना मी हेच अधोरेखित करायचा प्रयत्न केला की ज्ञान आणि श्रद्धा यांचा संगम झाल्यावरच खरी प्रेरणा निर्माण होते. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड, जिज्ञासा आणि अभिमान निर्माण व्हावा, हीच माझी खरी इच्छा असल्याचे प्रा. श्रीकांत चिंचखेडकर म्हणाले.

## संक्षिप्त

### पावसात तुंबलेल्या नालीच्या पाण्याने रस्त्यावर होतय गटार

#### मंठा शहर दुर्गंधीने त्रस्त; नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर संकट



तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मंठा शहरातील अनेका प्रभागासह कुरशीगल्लीतील नाल्यांची दुर्दशा झाल्यामुळे सतत धार पडत असलेल्या पाऊसाचे पाणी रस्त्यावर येत आहे. व मागील काही वर्षापासून स्वच्छ न झाल्याने पाऊसाचे घाण पाणी मंठा शहरातील गल्लीबोळातून रस्त्यांवर घाण पाणी वाहण आसल्याने रस्त्यावर गटाराचे घाण पाणी वाहत आहे त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नगर पंचायतने स्वच्छता करून व नाल्यांचे बांधकाम करून वार्डातील समस्या जाणून घेतल्या पाहिजे व त्या समस्या कायमच्या सोडवण्यासाठी वार्डातील नगरसेवकांनी पुढाकाराने लोकांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे अशी मागणी वार्डातील खालेक कुरेशी यांनी केली आहे. गटार स्वच्छ न झाल्याने पावसाळ्यातील प्रत्येक पावसानंतर रस्त्यावर घाण पाणी वाहू लागते. त्यामुळे वार्डात सर्व दुर्गंधीचे साम्राज्यसर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य पसरते आणि नागरिक तसेच व्यापाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे मंठा नगर पंचायतने यावर उपाय योजना कराव्यात असा आवाज मंठा शहरातील स्थानिक रहिवाशांच्या चर्चेतुन येत आहे.

### वाहतूक शाखेच्या घेतलेल्या विशेष मोहिम दरम्यान कारमध्ये कोयता घेऊन जाणाऱ्या इसमावर गुन्ह्याची कारवाई

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने घेतलेल्या विशेष मोहिम दरम्यान कारमध्ये कोयता घेऊन जाणाऱ्या इसमावर गुन्ह्याची कारवाई आज रोजी १७:०० ते १८:३० वाजे पोवेतो जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने तालुका जालना पोलीस ठाणे समोर मोटार वाहन कायदा अंतर्गत केलेल्या ई चलन केसेसचा प्रलंबीत दंड वसूल करणे व संशयीत वाहनाची तपासणी करणे यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली आहे. सदर विशेष मोहिम दरम्यान एक कार क्र.MH ४९ AS ६९५२ स्विफ्ट डिझायर यामध्ये लोखंडी कोयता तसेच गाडीमध्ये अनाधिकृत सायरन दिवा लावलेले आढळल्याने सदर कारचा चालक सुरेश काशीनाथ पुंगळे वय २५ वर्षे रा. दरेगाव ता.जि.जालना याचे विरुध्द कदिम जालना पोलीस ठाणे येथे पोहेकॉ/७७४ गणेश जाधव यांच्या फिर्यादीवरुन भारतीय हत्यार कायद्याच्या कलमाअन्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदर विशेष मोहिम दरम्यान मोटार वाहन कायदा ई चलन चा प्रलंबीत ३४५५० रु.दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच दिनांक २४/०८/२०२५ रोजी जिल्हा वाहतूक शाखेचे अंमलदार आष्टी पाथरी रोडवर मोटार वाहन कायदा केसेस करीत असतांना संशयास्पद इसम नामे सुखदेव लक्ष्मण सोनवणे वय ३२ वर्षे रा. बनगाव ता. अंबड जि. जालना यास मोटार सायकलवर जातांना थांबवुन विचारपुस केली असता त्याचे कडील तो चालवित असलेल्या मोटार सायकल क्र.MH २१ BK ८१४५ या नंबर व चेसीस इंजन नंबरची पडताळणी केली असता त्यात तफावत मिळून आल्याने व सदर मोटार सायकल चोरीची असल्याबाबत संशय निर्माण झाल्याने सदर इसमास मोटार सायकलसह पुढील कार्यवाहीकामी आष्टी पोलीस स्टेशन येथे रिपोर्टाने हजर केले आहे. सदरची कारवाई अजय कुमार बन्सल पोलीस अधीक्षक जालना, आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि चंद्रकांत चातुरे, कृष्णा चव्हाण, गणेश जाधव संदिप बोंद्रे, विजय लोखंडे, महंमद चौधरी, राजेश दहिवाळ यांनी केली आहे.

### गणेश मंडळांनी गणेशोत्सव उत्साहात साजरा करत असताना पोलिसांना सहकार्य करावे

तभा वृत्तसेवा
पारध / प्रतिनिधी



भोकरदनं तालुक्यातील पारध पोस्टे हद्दीमध्ये एकुण ३३ गावे येत असुन एकुण बारा गावामध्ये एक गावं एक गणपती बसलेले असून सर्वांना डी जे बंदी असल्याची सुचनां दिलेल्या असल्याची माहिती पारध पो. स्टे. चे ठाणेदार संतोष माने लातुरकर यांनी दिली ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आलेला असून सर्व गणेशभक्तांना तसेच नागरिकांनी शांततेत हा सण साजरा करावा व पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन ठाणेदार माने यांनी दिली .

## खेळाडूंनी मेजर ध्यानचंद सारखे नावलौकिक करावे



तभा वृत्तसेवा
जाफराबाद /प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद जालना ज्यांच्या आदेशान्वये १४,१७,१९ वर्ष वयोगटातील मुला मुलींचे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन पी. एम. श्री.जिल्हा परिषद प्रशाला जाफराबाद येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि उद्घाटक म्हणून मुख्याध्यापक श्री.उमेश दुनगहू हे होते. उद्घादन भाषांना मध्ये उमेश दुनगहू सर यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने मेजर ध्यानचंद यांना अभिवादन करून सर्वांना क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. खेळाडूंनी सी के नायडू, विनू मंकड, कपिल देव, सचिन तेंडुलकर, नीरव चोपडा, कसाबा जाधव, मेरी कॉम, सुनील गावसकर, पी. टी. उषा, सायना मिर्झा, विश्वनाथ आनंद या सारख्या खेळाडूंनी त्यांच्या खेळा मध्ये त्याचप्रमाणे मेजर ध्यानचंद यांनी देशाचे नाव लौकिक केले. असेच विद्यार्थी खेळाडूंनी ही खेळावे आणि आपल्या शाळेचे, तालुक्यांचे, जिल्ह्याचे, राज्याचे आणि देशाचे नाव लौकिक करावे असे प्रतिपादन केले आहे. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून तालुका क्रीडा समन्वयक वाहेद पटेल, प्रा. शिवाजी वैद्य, जे. एम. सोनवणे , श्रीमती. बी. आर. पेद्दी, शैलेश वाघमारे, ओम देशमुख इत्यादी क्रीडा शिक्षक उपस्थित होते. या स्पर्धा व्यवस्थित पार पडण्यासाठी पंच म्हणून आकाश छडीदार, स्वप्नील वाघ यांनी चोख भूमिका मांडली. या प्रसंगी जाफराबाद तालुक्यातील पी. एम. श्री. जिल्हा परिषद प्रशाला जाफराबाद, समर्थ विद्यालय जाफराबाद, एम. श्री. जिल्हा परिषद प्रशाला माहोरा, जिजामाता विद्यालय हनुमंतखेडा, मारोतराव देशमुख विद्यालय टेंभुर्णी, सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालय जाफराबाद इत्यादी शाळांनी सहभाग नोंदवला. या सर्व शाळेचे आणि पंचांचे पी. एम. श्री. जिल्हा परिषद प्रशाला जाफराबाद शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

## बँक ऑफमहाराष्ट्रतर्फे वित्तीय समउपदेश व कर्ज मेळावा

तभा वृत्तसेवा
बदनापूर / प्रतिनिधी

बँक ऑफ महाराष्ट्र, बदनापूर शाखा व विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला येथे वित्तीय समावेशन व कर्ज मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात शेतकरी व महिलांना मोठ्या प्रमाणावर कर्जवाटप करण्यात आले. या मेळाव्यात १० शेतकऱ्यांना १२ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. तसेच ५ महिला बचत गटांना १९ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले. याशिवाय १५ जणांची अटल पेन्शन योजना, १७७ प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, १७८ प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना नोंदणी तर १२७ वारसदार नोंदी व १९६ नागरिकांचे घधउ पूर्ण करण्यात आले. या वेळी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व अटल पेन्शन योजना याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली. प्रधानमंत्री जीवन ज्योती योजनेसाठी केवळ ४३६ रुपये वार्षिक तर सुरक्षा विमा योजनेसाठी






फक्त २० रुपये वार्षिक भरून २ लाखांपर्यंतचे विमा संरक्षण मिळू शकते. जिल्ह्यातील ४ लाख ७० हजार जनधन खातेधारकांपैकी आतापर्यंत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत २२४ लाभार्थ्यांना प्रत्येकी २ लाख रुपये, तर प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेत ६४ लाभार्थ्यांना दावा रक्कम वितरित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला बँक ऑफ महाराष्ट्रचे उपप्रादेशिक अधिकारी मुकुंद कांबळे, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी मंगेश केदार, RBI LDO अक्षय गोंदेवार, तसेच बदनापूर शाखेचे व्यवस्थापक अमित सदानशिव व अजित मुंडे उपस्थित होते. माननीय मुकुंद कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, या योजनांचा उद्देश कुटुंबीयांना आर्थिक सुरक्षेची छहमी देणे हा आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी सांगितले की, या योजनेअंतर्गत गरजू कुटुंबांना आर्थिक मदतीचा लाभ मिळाला असून भविष्यात याचा अधिकाधिक प्रसार करण्यात येणार आहे.लाभार्थ्यांनीही सरकारच्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

## गौरी सणासाठी फराळाचे साहित्य तयार करण्याची लगबग बाजारपेठेत महिलांची खरेदीसाठी गर्दी, महालक्ष्मीच्या मुखवट्यांसह अन्य वस्तू विक्रीसाठी दाखल

तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

तालुक्यात गौरी – गणपतीच्या सणाचा उत्साह दिसून येत आहे. गणरायाच्या आगमनानंतर आता गौरींच्या आगमनाची घरोघरी तयारी करताना महिलांची लगबग सुरू आहे. त्यामुळे महालक्ष्मीचे मुखवटे, साज – सजावटीचे साहित्य खरेदीबरोबरच फराळाचे अनारसे, करंज्या, पुऱ्या, बेसन लाडू, शेवचिवडा, पापड्या आदी विविध प्रकारचे फराळाचे साहित्य तयार करण्याकरिता महिलांची बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी होत आहे. काही वर्षांपूर्वी ग्रामीण भागात ठरावीक घरीच



महालक्ष्मी सणासाठी फराळाचे बनविले जात होते. तर काही ठिकाणी ज्या महिलांना फराळाचे साहित्य तयार करता येत होते, त्या इतर अलीकडच्या काळात सोशल मीडियाचा वापर वाढल्यापासून अनेक महिला फराळाचे साहित्य बाजारातून खरेदी करून यूट्युबवर रेसिपी पाहून अनारसे, करंजा, चकल्या, गुलाबजाम आदी खाद्यपदार्थ घरी तयार करीत आहेत. त्याबरोबरच काही महिला किलोप्रमाणे मजुरी घेऊन फराळ तयार करून देत असल्याने त्यांनादेखील रोजगार उपलब्ध झाला आहे. दरम्यान, शहरातील काही उपाहारगृहांवर खाद्यपदार्थ विक्रेते यांच्याकडे रसमलाई, पेढे, कलाकंद, बासुंदी, लाडू, अनारसे व इतर अनेक प्रकारच्या दुग्धजन्य पदार्थांची व मिठाईची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. महिलांना फराळ तयार करून देत होत्या.

### भेसळीची शक्यता

गौरी–गणपती, नवरात्र, दसरा, दिवाळी या सणांना दुग्धजन्य खाद्यपदार्थ व मिठाईची मागणी वाढते. यामध्ये भेसळ होण्याची शक्यता असते. तसेच काही व्यावसायिकांकडून जास्त नफा मिळावा या उद्देशाने भेसळयुक्त खाद्यपदार्थही विकू शकतात, त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतला बँकर्स बैठकीत विविध शासकीय योजनांच्या प्रगतीचा आढावा

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

बँकांनी मुख्यमंत्री रोजगार हमी कार्यक्रमांतर्गत सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. आजपर्यंत केवळ ६० प्रकरणांना मंजुरी मिळाली असून लक्ष्य १५०० आहे. तरी प्रत्येक शाखेने किमान दोन प्रकरणे शोधून त्यांना मंजुरी द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले. आज जालना जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बँकर्स बैठकीत विविध शासकीय योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्ह्यातील सर्व बँकांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, पीएम एफएमई (PMFME) व एआयएफ (-IF) अंतर्गत जालना जिल्ह्याची कामगिरी समाधानकारक असली तरी चालू वर्षी मंजुरी फक्त ३६ प्रकरणांची झाली आहे. तर १३८ प्रकरणे प्रलंबित असून बँकांनी ती प्राधान्याने निकाली काढावी. पीएम विश्वकर्मा या केंद्र शासनाच्या सर्वसमावेशक योजनेची माहिती बँकांना देण्यात आली. या योजनेत १८ पारंपरिक व्यवसायांचा समावेश असून त्याचा जास्तीत जास्त लाभ जिल्ह्यातील लाभार्थ्यांना मिळावा यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. जिल्ह्यातील प्राथमिकता क्षेत्र कर्जपुरवठा व एमएसएमई कर्जपुरवठा यामध्ये बँकांनी चांगली कामगिरी केली असून जून २०२५ अखेर पहिल्या तिमाहीत ५०% प्रगती साधली आहे. पिककर्ज वितरण बाबतीत आतापर्यंत ४३% इतकी (५७५ कोटी) प्रगती झाली आहे, तर वार्षिक लक्ष्य १३२० कोटी आहे. शेतकऱ्यांच्या कमी प्रमाणात नूतनीकरणामुळे ही प्रगती अपेक्षेप्रमाणे नाही, असे निदर्शनास आले. जिल्ह्यातील ३.३१ लाख शेतकऱ्यांना एकूण ३३९६ कोटींचे पिककर्ज वितरित झाले आहे. मात्र २.६१ लाख शेतकऱ्यांचे सुमारे २५०० कोटी (७३%) थकबाकीचे आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY) अंतर्गत जिल्ह्यातील २,४०,००० पात्र शेतकरी कर्जखाते (KCC -ccounts) असून त्यापैकी केवळ ९% खाती विमा कवचाखाली आली आहेत. सर्व पात्र खात्यांचा समावेश ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत करावा. मिशन शक्ती – महिला बचत गट (MSRLM² SHG) अंतर्गत



बँकांनी चांगली कामगिरी केली असून पहिल्या तिमाहीत ३६% प्रगती साधली आहे. तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने योजनांचा प्रसार व्हावा यासाठी यशोगाथा व योजनांची माहिती देणारे व्हिडिओ तयार करावेत, तसेच पोस्टर्स लावून जनजागृती करावी, असे निर्देश देण्यात आले. याशिवाय महामंडळाने बँकांचे ऑनलाईन पोर्टल विकसित करावे. बँकांना आर्थिक साक्षरता सल्लागारामार्फत (Financial Literacy Counsellor) किमान १०० गावांतील नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे आवाहन केले. बँका, म्युच्युअल फंड्स इत्यादीमध्ये नागरिकांनी गुंतवणूक करून बचत व आर्थिक शिस्त वाढवावी, यासाठी जनजागृती करावी, असेही सांगितले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# अतिवृष्टीमुळे लोह्यातील जनजीवन विस्कळीत

## पावसाचे पाणी घर व दुकानात अनेक कुटुंब उघड्यावर ; वीज गुल, मोबाईल नेटवर्क गायब

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ३० ऑगस्ट -**

मागील तीन ते चार दिवसांपासून संततधार सुरू असल्याने लिंबोटी धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक वाढत आहे. लिंबोटी धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने नदी पत्रातून पाण्याचा विसर्ग केल्याने सांडव्या खालील गावे पुराच्या पाण्याने प्रभावित झाली. २८ रोजी रात्रभर जोरदार पाऊस झाल्याने नदी नाल्यांना पूर येऊन अनेकांच्या घरात पाणी शिरले तर शेकडो हेक्टर शेती व पिके पाण्याखाली गेली. शहरातील भिमा नदीला आलेल्या पुरामुळे नदी काठावरील घरे आणि दुकानात पाण्याचा प्रवाह शिरल्याने कोट्यवधींचे नुकसान झाले. पुराच्या पाण्यात रुग्णवाहिकेसह एक कार आणि असंख्य दुचाकी वाहून गेल्या तर कांहीं मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्या. शहरातील पुलावरून पुराचे पाणी वाहत असल्यामुळे अनेक तास दुतर्फा वाहतूक ठप्प झाली होती. पुराच्या पाण्यात बसविण्यात आलेली वीस फुट मूर्ती शेड सह वाहून गेले. अनेक कुटुंब उघड्यावर आली, अनेक दुकानात पाणी साचल्याने नुकसान झाले, अनेक टिनशेडचे, दुकानाचे नुकसान झाले. सर्वत्र पावसाचा हाहाकार पहावयास मिळाला.

संततधार पाऊस हा गत चार दिवसांपासून सुरू आहे. त्यामुळे नदी नाल्यांना पूर आला आहे. तसेच उर्ध्व मानार लिंबोटी धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने पाण्याचा येवा दि. २९ रोजी पहाटे पर्यंत सुरूच होता. त्यामुळे लिंबोटी प्रकल्पातून पहाटे पर्यंत बारा दरवाजे १.५ मीटर तर दोन दरवाजे २ मीटर ने उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात येत होता. त्यामुळे लिंबोटी धरण खालील गावांना पुराच्या पाण्याचा धोका निर्माण झाला. शेकडों हेक्टर शेत जमिनी, खरीप पिके पाण्याखाली गेले. नदीकाठी असलेल्या जमिनी खरडून गेल्या. शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे अतोनात नुकसान झाले. लोहा शहरातून जाणाऱ्या नदीला कधी नव्हे एवढा प्रचंड पूर आला होता. नदी काठावरील साई गोल्डन सिटी परिसरात पुराचे पाणी घुसल्याने अनेकांच्या घरात चार ते पाच फूट पाणी साचले होते. सदर परिसरात घरासमोर उभी केलेली रुग्णवाहिका व युवराज वाघमारे यांची चारचाकी पुराच्या पाण्यात वाहून गेली मात्र कांहीं अंतरावर असलेल्या झुडपात अडकल्याने मिळून आली. तर जवळपास तीस हून



अधिक मोटारसायकली पुराच्या पाण्यात वाहून गेल्या कांहीं मोटारसायकली मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्या होत्या. शहरातील पुलालगत असलेल्या चव्हाण कॉम्प्लेक्स मधील शशिकांत कऱ्हाळे यांचे विठाई साडी सेंटर यांच्या दुकानातील रेडीमेड ड्रेस, साड्यांचे लाखों रुपयांचे कपडे भिजून नुकसान झाले. लुंगारे यांच्या प्लायवुड दुकानात पुराचे पाणी गेल्याने दहा ते पंधरा लाखांचे नुकसान झाले. तसेच चंद्रकांत कोंडावार यांच्या इंटरप्रायजेस दुकानात पाणी गेल्याने कपाट, फ्रीज, वॉशिंग मशीन, एलइडी अशा जवळपास चाळीस लाखांहून अधिकचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. पुराच्या पाण्याचा जोर प्रचंड असल्याने स्मशानभूमीचे दोन्ही बाजूच्या संरक्षक भिंत पडली. स्मशानभूमी लगत दहा पत्र्याचे शेड पुराच्या पाण्यात वाहून गेले तसेच दुकानातील साहित्य पाण्यात वाहून गेल्याने प्रचंड नुकसान झाले. जुना लोह्यातील कलाल पेठ, साठेनगर, नवी आबादी, इंदिरा नगर, सिद्धार्थ नगर आदी सखल भागात रहिवाशांच्या घरात पाणी शिरल्याने नागरिकांना शेजाऱ्यांच्या घरात तात्पुरत्या स्वरूपात आश्रय घ्यावा लागला.

रात्रभर सुरू असलेल्या पावसाने संपूर्ण शहरातील वीज गुल झाली होती. तर अनेक मोबाईलचे टॉवर गुल झाल्याने शुक्रवारी दिवसभर एकमेकांशी संपर्क होत नव्हता. शहरातील जायकवाडी परिसरातील वसाहतीतील संजय राठोड यांच्या सखल भागातील घरात पाणी शिरल्याने त्यांना माजी नगरसेवक करीम शेख यांनी घराबाहेर काढून सुरक्षितस्थळी हलविले व त्यांना भोजन तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी जुना लोहा तसेच अन्य भागात पुराच्या पाण्याने नुकसान झालेल्या घरांची तसेच पूरपरिस्थितीची पाहणी केली. यावेळी प्रभारी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार विठ्ठल परळीकर व इतरांची उपस्थिती होती.

बस स्थानक परिसराच्या समोरील आंबेडकर नगर मध्ये इंदिरा नगर येथून येणाऱ्या मोठ्या नाल्यात पाण्याचा प्रवाहा जास्त असल्याने कोंडीबा ढवळे, ज्ञानोबा ढवळे, तातेराव कांबळे,गौतम बुद्धे, रमाबाई कांबळे, सुमनबाई कापुरे,यासह अनेक कुटूंबाच्या घरात पाणी शिरल्याने कौंटुबिक संसार संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झाले या सर्व कुटुंबाने संपूर्ण रात्र ज्ञानदीप बौध्द विहार विसावा घेतला.

**स्मशानात जीव मुठीत घेऊन पूर ओसरण्याची प्रतिक्षा**

लोहा शहरातील स्मशानभूमीत मसणजोगी जमातीचे कुटुंब आतील एका दहा बाय दहा च्या खोलीत वास्तव्यास आहे. अंत्यसंस्कारासाठी लाकडे विकून तसेच आतील स्वच्छता ठेवून आणि मयताच्या नातेवाईकांकडून पैसे गोळा करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. गुरुवारी रात्री बारा वाजल्यानंतर जोरदार पावसास सुरुवात झाली. दि. २९ रोजी शुक्रवारी पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास नदीला पूर येऊन स्मशानभूमीचे लोखंडी गेट तोडून आणि भिंती पाडून पुराचे पाणी स्मशानभूमीत घुसले. आतील एका छोट्या खोलीत वास्तव्यास असलेल्या लक्ष्मीबाई हणमंत कोंडेवाड आणि त्यांचा पंधरा वर्षीय मुलगा साईनाथ कोंडेवाड हे दोघेच घरात होते. पहाटे आवाज आल्याने बाहेर पाहिले असता सर्वत्र प्रचंड वाहणारे पाणी दिसत होते. जीव घाबरला, बाहेर आवाज देण्याचा प्रयत्न केला कुणीच दिसेना, दरवाजा आतून घट्ट लावून घेतला आणि देवाच्या धावा करत जीव मुठीत धरून पुराचे पाणी ओसरण्याची वाट पाहत होते. सकाळी साडेसात वाजल्यानंतर पुराचे पाणी ओसरले आणि जीव भांड्यात पडला. मात्र घरातील जीवनावश्यक साहित्य, अन्नधान्य, कपडे, सायकल, विक्रीसाठी ठेवलेले लाकडे पुराच्या पाण्याने वाहून गेल्याने संसार उघड्यावर पडल्याचे लक्ष्मीबाई यांनी प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.

### संक्षिप्त वृत्त

#### पावसाने नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करण्याची मागणी

**मुदखेड,**-मागील दोन दिवसापासून सततच्या पावसामुळे मुदखेड तालुक्यात शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे न भरून निघणारे नुकसान झालेले आहे शेतकरी आर्थिक स्थितीत कमजोर झालेला आहे त्यामुळे तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात अडकले आहेत. या शेतीचे पंचनामे करून आणि आणि सीता नदीवरील बंधाऱ्याचे काम करून व फुरसन साफ करून द्यावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे तसेच संदीप देविदास मोडवान, सचिन गोपीचंद चंद्रे, गिरीश कोतावार, देविदास रुकमाजी चंद्रे, विठ्ठल आचार्य, सुरेश मारोतराव ढगे, विजय कुमार पचलिंग, आनंदराव संभाजी ढगे, शिवाजी कोंडीबा संबोड, रामदास गिरमाजी कमजळे, शिवाजी केशवराव संबोड, सचिन बालाजी कवळे, सतीश शिवाजी काळे, कैलास मारोती चौदंते, सतीश शंकरराव मोरे, सुरेश गणपतराव मेगदे, ऍड उमेश गणपतराव मेगदे, लक्ष्मीकांत गणपतराव मेगदे, नंदकुमार गणपतराव मेगदे, रमेश गणपतराव मेगदे,सोनू पांडुरंग तेलंगे आदी उपस्थित होते.



**नवीन नांदेड : नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात काल सायंकाळपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली असून आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी भर पावसात नामदार हेमंत पाटील यांच्यासह अतिवृष्टी ग्रस्त भागाची पाहणी करून पुरग्रस्त नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही सरकार मदतीसाठी आपल्या पाठीशी असल्याचा विश्वासही दिला.**

## अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा : पालकमंत्री अतुल सावे



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० ऑगस्ट -**

नांदेड जिल्ह्यात मागील दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे प्रशासनाने तात्काळ पंचनामे पूर्ण करुन अहवाल शासनाकडे सादर करावा. जेणेकरुन नुकसानग्रस्तांना तातडीने नुसान भरपाई देण्यात येईल, असे राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीबाबत पालकमंत्री अतुल सावे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात सविस्तर आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार रविंद्र चव्हाण, आमदार बालाजी कल्याणकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. प्रारंभी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती दिली.

पालकमंत्री अतुल सावे यांनी कृषी, आरोग्य, जलसिंचन, बांधकाम, पुशसंवर्धन, विद्युत, महानगरपालिका विभागांच्या अधिकाऱ्यांकडूनही जिल्ह्यातील परिस्थिती विषयी माहिती जाणून घेऊन या सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याची सूचना केली. पावसामुळे पिकांचे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत. यासोबतच इतर नुकसानीचेही पंचनामे करुन शासनाकडे अहवाल सादर करावा. याबाबत मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी घेऊन तातडीने नुकसानग्रस्तांना भरपाई दिली जाईल. आरोग्य विभागाने आपली यंत्रणा सज्ज ठेवावी. विशेषत: साथरोग पसरु नये म्हणून आवश्यक ती खबरदारी घ्यावी. नगरपालिका व महानगरपालिकेने शहरात आरोग्याच्याबाबत दक्षता घ्यावी. बांधकाम विभागाने पावसामुळे नादुरुस्त झालेल्या रस्त्यांचे सर्वेक्षण करुन तात्काळ दुरूस्ती करावी. पशुसंवर्धन विभागाने मृत झालेल्या जनावरांचे पंचनामे करावेत. विद्युत विभागाने खंडित झालेला वीजपुरवठा सुरळीत करावा. जलसंपदा विभागाने हवामान खात्याचे अंदाज लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घ्यावी. ज्यांच्या घरामध्ये पुराचे पाणी जाऊन नुकसान झाले आहे त्यांनाही नुकसान भरपाई दिली जाईल, असेही पालकमंत्री अतुल सावे यांनी सांगितले. जिल्हा नियोजन समितीचा ५ टक्के निधी हा आपत्ती व्यवस्थापनासाठी राखीव ठेवण्यात येतो. त्याअनुषंगाने प्रस्ताव तयार करुन शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

दरम्यान नांदेड शहरात, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या नागरिकांना नृसिंह विद्यामंदिर हायस्कुल श्रावस्तीनगर येथे स्थलांतरीत केले आहे. याठिकाणी पालकमंत्री अतुल सावे यांनी भेट देऊन नागरिकांची विचारपूस केली.

## आकांक्षित तालुका अभियांनात किनवट तालुक्याचा राज्यात तिसरा क्रमांक

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ३० ऑगस्ट -**

पंचायत समिती, किनवट यांच्या वतीने आयोजित नीती आयोग : भारत सरकार अधिनस्त आकांक्षित तालुका कार्यक्रम अभियान संपुर्णता सन्मान सोहळा व आकांक्षा हाट या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलतांना आमदार भिमराव केराम यांनी सांगितले कि, दुर्गम व कमी विकसित भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावणे, विद्यमान योजनांचे एकत्रीकरण करून ठोस परिणाम साधणे या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या आकांक्षित तालुका कार्यक्रम अंतर्गत किनवट तालुक्याने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. ही आपल्यासर्वांसाठी अभिमानाची बाब असून, भविष्यातही या दुर्गम भागाच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकारी व कर्मचारी यांनी मनापासून झटले पाहिजे. या करिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या प्रशासकीय कार्यालयांच्या प्रशासकीय कामगीरीवर आधारीत १५० दिवसांच्या दुसऱ्या टप्प्यातील कार्यगुणांच्या आधारे देण्यात येणाऱ्या प्रशासकीय पुरस्कारांमध्ये किनवट तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांनी राज्यात पहिल्या तीन क्रमांकांमध्ये स्थान मिळवावे, राज्य शासनाचा प्रशासकीय कामगिरीसाठी १५० दिवसाचा दुसरा टप्पा २ ऑक्टोबर रोजी संपुष्टात येणार असल्याने, आतापासूनच अधिक जोमाने नागरीकांची कामे करुन व प्रश्न सोडवुन अधिक प्रशासकीय गुणके प्राप्त करत राज्यात पहिल्या तीन क्रमांकात स्थान पटकावले पाहिजे. असे आवाहन किनवट तालुक्यातील विविध शासकीय विभाग व कार्यालयात कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना संबोधित करतांना आ. केराम केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला दीपप्रज्वलनानंतर मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व



कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र व ग्रंथ देऊन विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी मंचावर आ. भिमराव केराम यांच्यासह, तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, प्र. बालविकास प्रकल्प अधिकारी शिवाजी जामोदे, सामाजिक कार्यकर्ते दयानंद दराडे उपस्थित होते. यात तत्कालीन गट विकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव, निवृत्त जिल्हा मृद सर्वेक्षण व चाचणी अधिकारी प्रकाश पल्लेवाड, तत्कालीन कृषी अधिकारी बालाजी मुंडे व त्यांचे २४ कृषी सहाय्यक, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. के.पी. गायकवाड व त्यांचे ८ सीएचओ, ९ एएनएम, १ बीसीएम, ९ आशा कार्यकर्त्या, तत्कालीन बालविकास प्रकल्प अधिकारी अश्विनी ठकरोड व त्यांच्या १५ अंगणवाडी सेविका, विस्तार अधिकारी (पं) निवृत्ती मुकनर, आकांक्षित तालुका फेलो पांडुरंग मामीडवार, पोषण परसबाग निर्मिती टीम लीडर गंगाधर घ्यार यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांनी केले तर सुत्रसंचलन उत्तम कानिंदे यांनी केले.

**'आकांक्षा हाट' चे उद्घाटन व्होकल फॉर लोकलचा वसा**

कार्यक्रमादरम्यान व्होकल फॉर लोकल उपक्रमाअंतर्गत स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने आमदार भीमरावजी केराम यांच्या हस्ते आकांक्षा हाट चे उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनात उमेद अभियानांतर्गत महिला स्वयंसहायता समूह, किनवट स्थित अतिप्रभावित मेगा पाणलोट प्रकल्प टीम, तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय यांनी सहभाग नोंदवला.

## महाकवी वामनदादा कर्डक जयंती महोत्सवाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० ऑगस्ट -**

गेली १९ वर्षापासून महाकवी वामनदादा कर्डक व प्रतापसिंग बोदडे यांच्या संयुक्त जयंती सोहळ्यानिमित्त आज दुपारी ठीक दोन वाजता डॉ. शंकरराव चव्हाण पेक्षा ग्रह येथे महाराष्ट्र तिल अनेक दिग्गज कलावंत मंडळीच्या उपस्थितीत जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार असल्याचे कार्यक्रमाचे मुख्य संयोजक संजय निवडगे यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे कळविले आहे.

## मेदनकल्लूर गावातील ८ नागरिकांना पुराच्या पाण्यातून एसडीआरएफ टीमच्या मदतीने काढले सुखरुप बाहेर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० ऑगस्ट -**

देगलूर तालुक्यामधील मेदनकल्लूर या गावामध्ये ८ लोक पुराच्या पाण्यामुळे अडकलेले होते. दिनांक २७ ऑगस्टपासून निजामसागर धरणाचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढवल्यामुळे त्याचा फटका देगलूर तालुक्यामधील तमलूर, मेदनकल्लूर, उमर सांगवी या गावांना बसला. त्या अनुषंगाने प्रशासनामार्फत २७ ऑगस्ट रोजी प्रत्येक गावी भेट देऊन नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर होण्याचे आवाहन करण्यात आले होते.

मेदनकल्लूर गावांमधील ८ व्यक्तींना प्रशासनामार्फत वेळोवेळी संपर्क साधून सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी आवाहन केले होते. तरी देखील संबंधित व्यक्ती गावामधून बाहेर पडले नाहीत. २८ ऑगस्ट रोजी प्रशासनामार्फत संबंधित व्यक्तींना सुरक्षितस्थळी हलवण्यासाठी गेले असता संबंधित व्यक्ती पळून जाऊन गावामध्ये लपून बसले. परंतु पाण्याचा प्रवाह वाढतच राहिल्याने प्रशासनाने काल २९ ऑगस्ट २०२५ रोजी एसडीआरएफ टीमच्या मदतीने संबंधित सिद्धी आनवर देसाई, सिद्धी असलम देसाई, सिद्धी मुक्रम देसाई, सिद्धी शाकीर सिद्धी मूनतान देसाई, पाशा देसाई, सिद्धी शरीफ देसाई, बागवानिन अमीन खान, मुमताज अमुजामी यांना सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास सुरक्षितरित्या बाहेर काढले.

## श्री रेणुकादेवी मंदिर गडावरील स्कायवॉकचे काम ठप्प



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २९ ऑगस्ट -**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक मानला जाणारा श्री रेणुका मातेच्या गडावरील स्कायवॉक प्रकल्प अडखळल्याने भाविक व स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सुमारे ५१ कोटींचा निधी देऊन हा प्रकल्प २०२३ मध्ये मंजूर झाला. भाविकांना दर्शनासाठी सुलभता व गर्दीवर नियंत्रण मिळविण्याच्या उद्देशाने हा स्कायवॉक उभारण्यात येणार होता. १८ महिन्यांत काम पूर्ण करण्याची अट ठेकेदारांवर टाकण्यात आली होती. त्यासाठी वनविभागातील तांत्रिक अडचणीही सोडवण्यात आल्या.

२९ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीत व्यापाऱ्यांनी सहमती दर्शवून कामाला सुरुवात झाली. मात्र, दोन वर्ष उलटूनही कामाचे केवळ ३०% पेक्षाही कमी प्रगती झाली आहे. परिणामी स्कायवॉकसाठी दुकानदारांनी रिकामी केलेली जागा सध्या वाहन पार्किंगसाठी वापरली जात असून मोठा सुरक्षेचा धोका निर्माण झाला आहे.

येत्या नवरात्रीत माहूर गडावर विक्रमी गर्दी अपेक्षित असताना काम ठप्प असल्याने भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.

दरम्यान, काम बंद झाले का?, असा आश्चर्याने तेवढयाच निराशेने गडावर येणारा प्रत्येक भाविक प्रश्न उपस्थित करतोय. यातील दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक असलेल्या भाविकांना या जन्मी तरी लाभ मिळावा यासाठी व्यापाऱ्यांनी प्रकल्प लवकर पूर्ण व्हावा अशी मागणी केली आहे.

## शेतकरी आणि नागरिकांनो धीर सोडू नका : आम्ही आपल्या सोबत असल्याचा आ. चिखलीकर यांनी दिला विश्वास

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. ३० ऑगस्ट -**

लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघात गेल्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टर वरील पिके खरडून गेली आहेत. अनेक गावात पाणी शिरल्याने घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे . अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी घाबरून न जाता हिम्मत राखावी. आम्ही आपल्या सोबत आहोत असा विश्वास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिला आहे. कालपासून आ. चिखलीकर हे अतिवृष्टीग्रस्त भागाच्या पाहणीसाठी भर पावसात गावोगावी भेटी देत आहेत. यावेळी नुकसानग्रस्त शेतकरी मदतीसाठी टाहो फोडत आहेत. या विदारक परिस्थितीने आ. चिखलीकर ही भारवले आहेत. परंतु निसर्गापुढे आपण हातबल असून शासन आपल्या पाठीशी उभे राहील असा विश्वास त्यांनी यावेळी दिला.

लोहा तालुक्यात कालपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे या भागातील सर्वच नदी नाल्यांना पूर आला आहे. लोहा शहरातील सकल भागातील अनेक घरात पाणी शिरले असून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी प्रशासनासोबत पुढाकार घेतला. आंबे सांगवी, शेलगाव , पिंपळगाव ढगे ,बारूळ , तेलूर येथेही अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने या गावातील नागरिकांनाही बारूळ येथे सुरक्षित स्थळी



हलविण्यात आले आहे . अनेक गावातील पूर्ण शेती पाण्याखाली गेली असून घरांचे प्रचंड नुकसान झाले आहे. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आजही लोहा तालुक्यातील अनेक अतिवृष्टीग्रस्त गावातील शेतकऱ्यांच्या आणि नागरिकांच्या भेटी घेतल्या. पडझड झालेल्या घरांची आणि पुराने खरडून गेलेल्या शेताचे हे त्यांनी पाहणी केली. शेतकरी आणि नागरिकांनी आसमानी संकटाला घाबरून न जाता हिमतीने परिस्थितीचा सामना करावा .सरकार निश्चितपणे आपल्या पाठीशी उभे राहील आणि आम्हीही आपल्या सोबत आहोत असा विश्वास त्यांनी दिला . जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा प्रशासन पूर परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी संपूर्णपणे काम करत आहेत. पोलीस यंत्रणा महसूल यंत्रणा आणि शीघ्रगतीच्या सर्व यंत्रणाही कामाला लागल्या आहेत. मात्र निसर्गापुढे सर्वच हातबल ठरत असल्याने नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन सुरक्षित स्थळी राहावे . स्वतःची काळजी घेताना आपल्या नातलगांची आणि आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीलाही सुरक्षित स्थळी हलवावे. लवकरच या निसर्गाच्या संकटातून आपण बाहेर पडू असा विश्वासही आ. चिखलीकर यांनी यावेळी व्यक्त केला. दरम्यान आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी बारूळ धरणाची पाहणी केली . बारूळ धरणातून सुरू असलेल्या पाण्याच्या निसर्गाची त्यांनी पाहणी करून माहिती घेतली. बारूळ धरणा खालील नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून नागरिकांनी आपल्या पाळीव प्राण्यांसह स्वतःला सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावे अशी विनंती ही त्यांनी यावेळी केली आहे.

यावेळी तहसीलदार पोलीस उपविभागीय अधिकारी अश्विनी जगताप, विठ्ठल परळीकर लोहा नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती झुतमल नगरसेवक करीम शेख, नगरसेवक भास्कर पवार, शंकरराव नाईक, मारुती पाटील मजरे, माजी जिल्हा परिषद सदस्य धोंडीराम बोडलवार, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.